

# [illegible]

किं. ५० न पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

" स्त्रीजन्माची स्थिति मोठी विचित्र असते. तो देह अनीतीच्या भक्षस्थानीं कधीं पडेल हें सांगतां येणें कठीण असतें. त्यासाठीं नेहमीं सावधगिरीनें राहिलें पाहिजे. शेळी हें लांडग्याचें भक्ष्य; त्याच्या तावडींत ती कधीं सांपडेल हें सांगतां येत नाहीं. त्यासाठीं कुंपणाच्या बंधनांत तिला ठेवावें लागत असतें. स्त्री म्हणजे शेळीच होय. तिला विविध व्रतरूपीं बंधनांत ठेवणें प्राप्त असतें. स्त्रियांनींही जपून वागलें पाहिजे. पति असला म्हणून काय झालें? आपण नियमांचें बंधन बाळगलेंच पाहिजे. आपल्या मुलाबाळांचें काळजीपूर्वक संगोपन करणें हें स्त्रियांचें आद्य व महत्तम कर्तव्य आहे; तें पालन करण्यांत तिनें थोडीसुद्धां कुचराई करतां कामा नये. आपल्या मुलांस चांगलें वळण लागेल, तीं सन्मार्गानें वागणारीं व कर्तबगार होतील याची काळजी तिनें वाहिली पाहिजे. तसेंच आपली सासू, सासरा, दीर, जावा यांच्याशीं तिनें प्रेमानें व अदबीनें वागावें, त्यांचा द्वेष केव्हांहि करूं नये. सवत असली तरी तिच्याशीं वागणूक प्रेमळपणाची असावी. चार-चौघांनीं गुण गावे अशीच आपली वागणूक सदैव असावी. "

— श्रीसाईसच्चरित

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३९ वें ] फेब्रुआरी १९६१ [ अंक ११ वा

: संपादक :

**गो. वि. क्षीरसागर**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

**टे. नं. २५१२७४**

: कार्यालय :

**साई निकेतन,' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४/बी, दादर, मुंबई १४**

# प्रिय वाचक—

सध्यांचें जग नियोजनाचें व नियंत्रणांचें आहे. कोणत्याहि गोष्टींत यश मिळवायचें असल्यास कांहीं नियंत्रण संभाळणें व अगाऊ आखणी करणें अत्यावश्यक असतें. तें जेथें घडत नाहीं तेथें पदरांत अपयशच पडायचें.

आपण एखाद्या रस्त्यानें जात असतों. त्या रस्त्यानें पादचारी, सायकलस्वार, मोटारवाले, टॅक्सीवाले चाललेले असतात. त्यांतच बसगाड्यांची व ट्रामगाड्यांची व इतर वाहनांचीहि गर्दी उडून गेलेली असते. नाक्यावरील एखाद दुसरा पोलिस शिपाई त्यांचें नियंत्रण करीत असतो. त्याचें प्रत्येकानें ऐकावें लागतें. तें ऐकायचें नाहीं; आपण आपलें स्वैरपणें चालूं लागायचें असें कोणी म्हटलें व तसा तो वागूं लागला तर त्याच्यावर आपत्ति ओढवल्याशिवाय रहाणार नाहीं. त्या शिपायानें योजना आंखून ठेवलेली असते. ती सर्वांच्या कल्याणाची असते. ती पार पाडण्याच्या बाबतींत त्याला प्रत्येकानें सहकार दिला पाहिजे. नाहीं दिला तर त्यांत सर्वांचाच नाश आहे. यासाठीं रस्त्यावरून जाण्यायेण्यासंबंधीं जीं नियंत्रणें असतील तीं आपण पाळलीं पाहिजेत.

हें सांगण्याचें कारण काय? या जगांत जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला आपण मोठें व्हावें, कर्तबगारी गाजवावी व जगांत नांव मिळवावें असें वाटत असतें. असें वाटण्यांत चूक मुळींच नाहीं; मात्र त्यासाठीं सहाय्यभूत होणारें वर्तन आपल्याकडून घडत नाहीं, तें घडलें पाहिजे. प्रत्येकाच्या ठायीं पराक्रमाला व कर्तबगारीला पोषक अशी अमर्याद शक्ति असते. उत्साह असतो. त्या शक्तीचें व उत्साहाचें आपण योग्य प्रकारें नियंत्रण केलें पाहिजे. त्या शक्तीचा अपव्यय न करतां ती योग्य वेळीं व योग्य कारणींच खर्च होईल, याबद्दल योजनाबद्ध दक्षता बाळगण्यांत आली पाहिजे. अंगांत ईश्वरदत्त सामर्थ्य असलें तरी तें मोकाट सोडून व वाटेल तसें वापरून चालेल का?

ईश्वरानें तुम्हांला इच्छाशक्ति दिलेली आहे. तुमच्यांत चैतन्य वास करीत आहे. याचा सदुपयोग करून तुम्ही जगांत नाव मिळवूं शकतां. तुम्हांला आगेकूच करावयाची आहे. जरूर करा. परंतु दुसऱ्यांना धक्के बुक्के मारून किंवा दुसऱ्याचा मार्ग अडवून आगेकूच करूं नका.

या जगांत सर्वांना सारखे अधिकार आहेत. प्रत्येकानें आपआपल्या मार्गानें खुशाल जावें. या जगाची एकसारखी उलथापालथ होत आहे. ती ईश्वरी प्रेरणेनें होत असते. आपण कोणाचेंहि अकल्याण न चिंतितां किंवा कोणाच्याहि आड न येतां आपला मार्ग चोखाळावयाचा आहे. ईशोपनिषदांत म्हटलें आहे कीं, ईशा वास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्. याचा अर्थ तोच आहे.

———




**************** संकलक : आमचे प्रतिनिधि ****************

## संकटें दूर करणारे श्रीसाईच

श्री रामचंद्र गंगाधर गुळवणी, मु. तळ, मौजे पेण, जि. कुलाबा हे लिहितात कीं, "भक्तवत्सल श्री. साईनाथांनीं मला 'साईभक्तीकडे' कसें वळविलें या विषयी स्वानुभव खालीं देत आहें :—

सन १९४१ ते १९४५ सालीं मी मुंबईस 'मलमल' कापडाच्या गिरणींत नोकरीस होतों. तेव्हां श्री. साईबोधवचनें 'शिरडीस ज्याचे लागतील पाय। टळती अपाय सर्व त्याचे'। वगैरे माझ्या प्रथम पाहण्यांत आलीं. आत्मस्तुतिपर तें वर्णन वाचून श्री साईंच्याबद्दल मनांत विचार उठले कीं साईबाबा सद्गुरु नव्हेत. जो आपणांस फार श्रेष्ठ मानतो व तशी फुशारकी मारतो तो पूर्ण अज्ञानी समजावा, अशा तऱ्हेची माझी विचारसरणी असल्यामुळें श्री साईनाथ हे भोंदू व स्वार्थसाधु असावेत असा माझा ग्रह झाला होता. यापूर्वी मी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, नवनाथ कथासार, यासारखे पुष्कळ ग्रंथ वाचले होते. श्रीभगवद्गीता आपोआप आमचे कै. आजोबांच्या सान्निध्यात कंठस्थ झालेली आहे व त्यांतील अद्वैत सिद्धांताचा अभ्यास मी केला होता. श्री. साई-बाबांचीं बोध वचनें खरोखरच अधिकारी संतांची बोधवचनें असून तीं अक्षरशः सत्य आहेत यावर माझा विश्वासच बसत नसे. अखेरीस श्री. साई सद्गुरूंनीं मला प्रचीति दाखवून माझ्या मनांतील किल्मिष दूर केलें. ती हकीकत अशी—

सन १९५९ च्या मे महिन्यांतील गोष्ट. आमचा धाकटा मुलगा सुमारें २॥-३ वर्षांचा होता. सर्व मुलांपेक्षां देखणा, सशक्त व गोंडस बाळ होता तो! परन्तु फक्त १५ दिवस तापानें व वांतीमुळें आजारी होऊन देवाघरीं गेला. त्यामुळें मनास जबरदस्त धक्का बसला. रात्रीं झोंपही येत नसे व वारंवार दचकून जागा होत असें. अशा परिस्थि-तींत आम्ही सर्वजण घरीं पेणेस गेलों व तेथें श्रीसाईबाबांच्या विलक्षण लीलेचे कांहीं अनुभव मला समजले. गांवांतील एका मराठे जातीच्या ५५ वर्षे वयाच्या म्हाताऱ्या शेतकऱ्यास गेलीं ४-५ वर्षे पोटदुखीमुळें फार त्रास होत असे. श्रीसाईनाथांच्या छवी-समोर हात जोडून त्यानें एके दिवशीं मनोभावानें प्रार्थना केली. व त्याची पोटदुखी हल्लीं कायमची बरी झाली आहे. तसेंच फायनल परीक्षेस ४-५ वेळां बसून अनुत्तीर्ण झालेल्या

गावांतील एका गरीब मुलानें श्रीसाईनाथांची प्रार्थना केल्यावर उत्तम तऱ्हेनें तो पास झाला. यासारखे स्वानुभव त्या व्यक्तींनीं मला सांगितल्याबरोबर माझेंही मनांत श्रीसाईबाबांचेविषयी आदर व श्रद्धा निर्माण झाली.

घरीं पेणेस गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशींची गोष्ट. श्री साईबाबांची मोठ्या आकाराची तसबीर आमच्या ओटीवर लावलेली होती. दुपारच्या जेवणानंतर ओटीवर सहज पडलों तोंच श्री. बाबांच्या छबीकडे माझें लक्ष गेलें. मनांत नुकत्याच २, ३ दिवसांपूर्वी घडलेल्या दुःखद घटनेविषयीं विचार येत होते. इतक्यांत काय चमत्कार! श्री. साईबाबा मला उद्देशून बोलत आहेत, असा भास झाला. ते माझ्याकडे रोखून पहात व माझा धिक्कार करीत मला कांहीं सांगत आहेत असें वाटलें—" काय! रडतोस? दुःख करतोस? मुलाबद्दल दुःख! माझ्याकडे पहा. मला अशीं कांहीं दुःखें आहेत कां? मी कुठें लग्न केलें आहे? मला आहेत कां तुझ्यासारखीं मुलें बाळें? हा सर्व पसारा तूंच नाहीं कां वाढविलास? दुःख कसलें करीत बसला आहेस? चल ऊठ! दुःख विसरून जा! मनास समाधान ठेव!"

वरील शब्द आजही माझ्या कानांत घुमत आहेत. काय त्या उपदेशाचा विलक्षण प्रभाव कीं माझ्या मनांतून पुत्रशोक एका क्षणांत नाहींसा झाला. बाबांनीं आज्ञा दिल्याप्रमाणें मी झालेल्या सर्व घटना जाणून बुजून मुद्दाम विसरण्याचा प्रयत्न करूं लागलों. व श्रींच्या कृपेनें मला यांत संपूर्ण यश आलें; श्री. साई चरणीं सेवाभाव व श्रद्धा जोरानें वाढीस लागली. तसेंच श्री साईबाबांविषयींची दांभिकपणाची कल्पना पार मावळून जाऊन गेल्या २५ वर्षांत श्री साईसेवेस अंतरल्याबद्दल मनास पश्चात्ताप होऊं लागला.

यानंतर सुमारें १५–२० दिवस आम्ही सर्व घरींच होतों. झालेल्या अपघाताच्या कारण परंपरेकडे आम्ही नंतर लक्ष देऊं लागलों. आम्ही राहात होतों ती जागा कांहीं पिशाच्चबाधेची असावी असाही संशय आम्हांस आला. व दुसऱ्या जागेचा शोध आम्ही चालविला. रात्रीं मी व माझे थोरले बंधु त्याच घरांत झोंपलो असतां रात्रीं एक विलक्षणच स्वप्न पडलें. तें असें—' एक बगळ्या एवढा सफेद शुभ्र रंगाचा पक्षी आपले पंख मिटून घेऊन अकाशांत लोंबकळत आहे. आकाशांतून दोरीनें टांगून लोंबकळत सोडलेल्या पांढऱ्या शुभ्र लांबट नारळाप्रमाणें तो दिसत होता. आम्हीं सर्व आंगणांत बसलों आहों व तो पक्षी पुन्हां पुन्हां आमच्या तोंडासमोर येऊन आम्हांस त्रास देत आहे! आमची सर्वांची छाती धडधडूं लागली व त्या दृश्यानें मी झोंपेंतच थोडासा ओरडलोंही! माझ्या बंधूनीं मला ताबडतोब हांक मारून जागे केलें व त्यांना मीं सर्व स्वप्न सविस्तर सांगितलें. दुसरी जागा मिळण्यासारखी नव्हती म्हणून आम्हीं घरीं पेणेस दुसऱ्या दिवशीं परत आलों.

त्या दिवशीं गुरुवार होता. रात्रीं 'श्रीसाई महात्म्य' पोथी मनोभावानें वाचली

व झोपी गेलों. त्याच रात्रीं मला व माझ्या पत्नीस दोघांसहि स्वप्नांत आमच्या मृत पुत्राचें दर्शन झालें. आम्हीं दोघेहि त्यास कडकडून भेटलों.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं रात्रीं मी पुन्हां श्री 'साई महात्म्य' पोथी मनोभावानें वाचली. शनिवारीं सकाळीं नोकरीच्या गांवीं मुलंमाणसांसह जाण्याचा बेत केला होता. परंतु कृपाघन श्रीसाई आपल्या भक्तांस पुन्हां संकटांत कसे घालतील ? भक्तांच्या रक्षणाचें त्यांचें ब्रीद आहे. आपल्या भक्तांना संकटाची पूर्व सूचना देऊन त्यांचें रक्षण केल्याचीं श्रीबाबांचीं कित्येक उदाहरणें आहेत. त्या अनुसार माझ्या पत्नीस स्वप्नामध्यें माझा दुसरा मुलगा (वय सुमारें ५) घरामागील विहिरींत पडला असें दिसलें. तिनें सकाळीं उठल्याबरोबर आम्हांला ती सर्व हकीकत सांगितली. मी त्यावरून समजलों कीं, बाबांनीं आम्हांस ही धोक्याची सूचनाच दिली आहे. लगेच आम्हीं निघण्याचा बेत रहित केला व १।२ दिवसांनीं माझ्या थोरल्या बंधूसह व मोठ्या मुलीसह नोकरीचे गांवीं आलों. व रात्रीं त्याच घरांत राहिलों. गांवांतील कांहीं मंडळींना ही सर्व हकीकत सांगितली व घराच्या जागेबद्दल विचारलें. त्यावेळीं आम्हीं रहात असलेल्या घराबद्दल खरी माहिती समजली ती अशी—

'सदर घर कांहीं वर्षें ओसाड होतें. घराच्या मागल्या भागांत स्वयंपाक घराच्या कोपऱ्यांत एक पक्षी ओरडल्याचा आवाज येत असे. व त्यामुळें तेथें रहाण्यास भीति वाटत असे व बिऱ्हाडकरू जागा सोडून देत असत. त्यानंतर श्री. गोगटे नांवाच्या गृहस्थानीं त्या जागेची बाधा दूर करण्याचा प्रयत्न केला होता व तेव्हांपासून त्या पक्ष्याचें ओरडणें बंद झालें.

वरील माहिती समजल्यावर आमच्या आश्चर्यास सीमाच राहिली नाहीं. आम्हांस ज्या गोष्टींची यत्किंचितही माहिती नव्हती, त्या गोष्टी दयाघन श्रीसाई प्रभूनें आम्हांस आधींच सुचवून ठेवल्या होत्या. धन्य धन्य ते संत कीं जे आपल्या भक्तावर आईच्या मायेचें पांघरूण घालून त्यांचे सदैव रक्षण करतात ! वरील हकीकत समजल्यानंतर एकक्षणभरसुद्धां त्या घरांत राहावयाचें नाहीं असा आम्ही निश्चय केला. व श्रीसाईचें स्मरण करून दुसरी जागा पाहूं लागलों व आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझ्या एका मित्रानें मला दुसरी जागाही मिळवून दिली. दुसरेच दिवशीं आम्हीं आपलें सामान नव्या जागेंत आणलें. त्यावेळीं आम्हांस जर दुसरी जागा मिळाली नसती तर त्याच घरांत पावसाळ्याचे चार महिने राहावें लागलें असतें व आमच्यावर आणखी कोणत्या आपत्ति आल्या असत्या तें फक्त श्रीसाईच जाणे !

नव्या घरांत राहावयास गेल्यानंतर सुमारें एक महिन्यानंतर आमचीं मुलें माणसें अशीं सर्व राहाण्यास आलीं व सुमारें १५।२० दिवस तेथें राहिलों नाहीं तोंच थोरल्या मुलाच्या म्हणजे ज्याच्या संबंधीचें स्वप्न पडलें होते. त्याच्या गळ्याखालीं मोठी गांठ झाली. आधींच दुःखानें होरपळलेले व दुसऱ्या मुलावरहि हें गडांतर ! आमचें सर्वांचें धाबें दणाणलें, परंतु यावेळीं आमचा सर्वांत मोठा आधार म्हणजे साईनाथ, साईनाथांची छबी

योगायोगानें आलेली आहे. अगदीं सद्गदित अंतःकरणानें, प्रेमाश्रु दाटून येऊन प्रार्थना केली. 'बाबा, आतां आपणच तारणार समर्थ आहांत. मागील वेळीं आपणच मला धीर दिलात. यावेळींही आपण जरासुद्धां अंतर देणार नाहीं अशी खात्री आहे. माझा एकुलता एक राहिलेला मुलगाही माझा नव्हे, तुमचाच आहे. आतांच मी शिरडीस सव्वातीन ३। रुपये मनीऑर्डरनें पाठवून कुपनमध्यें सर्व हकीगत आपणांस कळवितों. तुम्हींच माझे खरे मार्गदर्शक सद्‌गुरू आहांत.' अशी प्रार्थना करून वरील आशयाचा मजकूर लिहून मनिऑर्डर दुसरे दिवशीं पाठविली. श्रीसाईंनीं आम्हांला सद्बुद्धि दिली व मी मुलास गोरेगांव येथील श्री. कर्णिक वैद्यांकडे घेऊन गेलों. त्यांनीं मुलास तपासून गांठीवर जळवा लावण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें जळवा लावल्या. एक सतक औषध दिलें व मुलगा उत्तम तऱ्हेनें बरा झाला. हा सर्व कोणाचा प्रभाव बरें ? श्रीसाईबाबांचाच हा प्रभाव आहे अशी माझी पक्की समजूत आहे.

अशा तऱ्हेनें आलेल्या सर्व संकटरूपी सागरांतून तारुन नेणारा चतुर नावाडी श्रीसाई असल्यामुळें माझा बचाव झाला. नाहींतर माझे डोक्यावर अनिष्ट परिणाम होऊन मी कोणत्या दशेंत असतों याची मला कल्पनाच करवत नाहीं. तेव्हांपासून हल्लीं श्रीदासगणुकृत साईनाथ स्तवन मंजिरी पठण, साई छबीचें पूजन, गुरुवारीं पूजेस तुपाचें निरांजन व नैवेद्यास पेढे व रात्रीं श्रीसाईसच्चरिताचें वाचन व सवडीप्रमाणें एखादा सप्ताह इत्यादि सेवा करीत आहें. कोणत्याही बिकट व संकटमय परिस्थितींत श्रीसाई स्मरण केल्यानें विघ्नें दूर होत आहेत. श्रीसाईचरणीं आतां एवढीच प्रार्थना आहे कीं या पामराकडून आजन्म सेवा घेऊन मला कृतकृत्य करावें."

## बाबा हाकेला ओ देतात

श्री. विष्णु सखाराम कुलकर्णी, सब इंजिनियर बॉंबे वॉटर वर्क्स, १२५ बाबुला टॅंकरोड मुंबई नं. ९ हे लिहितात कीं, मी साईभक्तापैकीं एक आहें. माझा प. पू. साईबाबा विषयीं आलेला अनुभव खालीं देत आहें.

प. पू. साईबाबा भक्तांच्या हांकेला ' संकटकाळीं ' ओ ' देतात. आमचें एक भक्तमंडळ आहे. त्या मंडळांतील कांहीं लोकांनीं गणेशपुरी येथें प. पू. नित्यानंद स्वामींच्या दर्शनास जाण्याचें ठरविलें. कांहीं लोकांनीं रेल्वेनें वसई मार्गें जावें व कांहीं लोकांनीं स्पेशल मोटारनें यावें असें ठरलें. कारण मोटारमध्यें जास्त लोकांची सोय होत नव्हती. त्या प्रमाणें आम्हीं ६ माणसें ता. ११-१२-६० रोजी सकाळीं ६-५५ ला महालक्ष्मी येथें विरार लोकल मध्यें बसलों व सकाळीं ८—३० वाजतां वसई स्टेशनवर उतरलों. ८-१५ पासून १-१५ पर्यंत आम्हांस, बसच्या लाईनींत उभें रहावें लागलें व आम्हीं साधारणपणें २-३० च्या सुमारास गणेशपुरी येथें पोहोंचलों. अर्थात् त्यावेळीं नित्यानंद स्वामींच्या दर्शनाचा दरवाजा बंद होता म्हणून आम्हीं चहापाणी, फराळ व स्नानें उरकून दुपारीं ४-३० वाजतां स्वामीचें दर्शन घेऊन ५ वाजतां परत येण्यास निघालों. येतांना आयतेवेळीं दुसरे आणखी मेंबर्स वाढल्यामुळें

स्पेशल मोटारनें येणारे लोक दोन मोटारींतून आले. परत जातांना आम्हांस वज्रेश्वरी देवीचें दर्शन घेऊन मग परत मुंबईस यावयाचें होतें. तेव्हां आम्हीं सर्वजण त्या दोन मोटारींतून वज्रेश्वरी येथें आलों. दर्शन वगैरे घेतल्यानंतर आम्हांस असें आढळून आलें कीं, दोन मोटारी पैकी एक मोटार पंक्चर झाली आहे. त्यामुळें पुन्हां कांहीं लोकांना बसनें येण्याचा प्रसंग आला. त्याप्रमाणें आम्हीं चौघेजण वज्रेश्वरीपासून ४ फर्लांगावर असणाऱ्या बस स्टँडकडे पायीं चालत गेलों. तेथें जाईपर्यंत आम्हांस सायंकाळचे ७ वाजले होते. व बस स्टॅन्डवर वसईकडे येण्याऱ्या बसच्या रांगेंत ३००–४०० लोक होते व ठाण्याकडे येणाऱ्या बसच्या रांगेंत १००–१५० लोक होते. चौकशी-अंतीं फक्त दोन बसेस जादा सुटणार होत्या व एकट्या क्यूमधून नंबर कसा लागेल असा मोठा प्रश्न पडला होता. नंबर न लागल्यास तेथेंच मुक्काम करावा लागणार होता. घरीं सायंकाळीं ७ वाजतां येतों म्हणून सांगितलें होतें. त्यामुळें फारच काळजी लागली. फोन करण्याची अगर अन्य मार्गानें घरी कळविण्याची सोय नव्हती. त्यामुळें फारच चिंता लागली होती. माझा प. पू. बाबांच्या नांवाचा सारखा जप सुरू होता व अशा वेळीं प. पू. बाबांशिवाय आपणांस कोणीहि मदत करणार नाहीं हे माहीत होतें. माझा प. पू. बाबांवर पूर्ण विश्वास असल्यामुळें मी बाबांची करुणा भाकली व सांगितलें कीं, ‘ बाबा ह्या भक्ताला काय हा त्रास देतां, आपण जर आतां मदत करणार नाहीं तर आम्हीं कोणाकडे बघावें. घरीं बायका मुलें वाट बघत असतील. तरी कृपा करून कांहींतरी आमची सोय लावावी. ’ त्याशिवाय मी म्युनिसिपल क्वार्टर्समध्यें रहात असल्यामुळें व एकादे वेळीं अकस्मात् एकाद्या निकडीच्या कामावर म्हणजे आगीवर पाण्याच्या पाईप फुटल्यास त्याच्यावर आम्हांस जावें लागत असल्यामुळें फक्त सायंकाळीं ८ वाजे पर्यंतच माझी रजा होती. आम्हांस परवानगीशिवाय बाहेर जातां येत नाहीं. त्यामुळें घरीं परत येणें अत्यंत आवश्यक होतें. असो. वरीलप्रमाणे मी प. पू. बाबांची मनोमन करुणा भाकली व काय आश्चर्य ५–१० मिनिटांतच एक ठाण्याकडे जाणारी बस आली व बस आल्याबरोबर लाईन मध्यें ( क्यू मध्यें ) गोंधळ माजला व पुन्हां पोलीसांच्या सहाय्यानें लाईन पूर्ववत्करून बघतो तों आमचा नंबर १६ वा लागला व आम्हांस लगेच त्याच बसमध्यें जागा मिळून रात्रीं ११–१५ वाजतां मी घरीं सुखरूप आलों. माझें अंतःकरण अतिशय गहिंवरून आलें व घरीं आल्याबरोबर मी प. पू. बाबांना साष्टांग नमस्कार घातला व सर्व मंडळीस घडलेली हकीगत सांगितली. तेव्हां प. पू. बाबा भक्तांच्या संकटकाळीं कसे धांवून येतात हें वरील अनुभवावरून समजेल. बाबा नसते तर आमची काय दशा झाली असती याची कल्पना करवत नाहीं.

असे माझे बरेच अनुभव आहेत. मी १९५० साला पासून प. पू. बाबांची भक्ति करीत असतों व मला बाबांनी वेळोवेळी जी मदत केली त्यावरून अशी माझी पक्की खात्री झाली कीं बाबा भक्तांच्या हांकेला नेहमींच ‘ ओ ’ देत असतात. फक्त अंतःकर-णापासून त्यांची करुणा भाकली पाहिजे, श्रद्धा संपूर्ण पाहिजे.

---

# संसारांत संपत्तीचें स्थान

**आपल्याजवळ द्रव्य पाहिजे. त्याशिवाय पाऊल पुढें टाकतां येत नाहीं. द्रव्याचा तिरस्कार करून आजच्या जगांत आपला निभाव लागणार नाहीं. जगांत निर्धनाला कोणी विचारत नाहीं. तेव्हां पैसा मिळविला पाहिजे, परंतु तो कसा व कोणत्या मार्गानें मिळवावा, धनार्जन हेंच सर्वस्व मानून राहावयाचें काय व धनाला मर्यादित स्थान देणें किती जरूरीचे आहे, याचें विवेचन या लेखांत करण्यांत आलें आहे.**

आजकाल कोणत्याहि देशाकडे पहा, प्रत्येकाची धडपड धनसंपन्न होण्यासाठीं चाललेली आहे. सुवर्णाचा साठा आपल्याकडे जास्तींत जास्त झाला पाहिजे असें अमेरिकेला वाटत असें, रशियालाहि वाटतें, आणि वाटत नाहीं कुणाला ! व्यक्ति व्यक्ति मध्यें सध्या चढाओढ व धडपड चालली आहे ती द्रव्यार्जनासाठींच नाहीं का ?

## धन हेंच सर्वस्व

आजकाल धन हेंच सर्वांचें आराध्य दैवत होऊन राहिलें आहे. आज यासंबंधीं कांहींतरी लिहावेसें वाटतें; तात्विकदृष्ट्या विचार करावासा वाटतो. अहो तत्त्व कसलें व तात्त्विक विचार तरी कसला ? आज लोकांना द्रव्यार्जनाशिवाय दुसऱ्या तत्त्वाचा विचार नको. राज्यकर्ते असोत वा प्रजाजन असोत. आज सर्वांना हवें आहे द्रव्य. कारण त्याच्याशिवाय राज्याचा काय किंवा व्यक्तींच्या संसाराचा काय, गाडाच पुढें जाऊं शकत नाहीं. द्रव्य नाहीं तर साऱ्या आकांक्षा जागच्याजागीं थबकल्या म्हणून समजावें. साधु, संन्यासी, महात्मा, ब्रह्मचारी–कोणीही असो, कमीजास्त प्रमाणांत प्रत्येकाजवळ द्रव्य हें पाहिजेच. फार प्राचीन काळीं द्रव्याची जरुरी भासत नव्हती असेल; परंतु आजच्या युगांत जवळ पैसा असल्याशिवाय पाऊल पुढें टाकतां येत नाहीं. म्हटलें आहे ना कीं—

**यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः ।**
**स पण्डितः स श्रुतिवान् गुणज्ञः ।**
**स एव वक्ता स च दर्शनीयः ।**
**सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ति ॥**

ज्याच्यापाशीं धनदौलत आहे तो माणूस कुलशीलवान्, तोच पंडित, तोच शास्त्रज्ञ व तोच विद्वान् गुणज्ञ. सुंदरहि तोच. एकूण काय कीं, सर्व गुणांचा समावेश सुवर्णांत होऊं शकतो. ज्याच्याजवळ सोनें नाणें आहे तो या जगांत सर्व कांहीं होऊं शकतो.

## धनिकाला सर्वत्र मान

या देशांत किंवा या जगांत तुम्हीं कुठेंहि जा. प्रत्येक ठिकाणीं धनाची व धनवानाची पूजा होत आहे. इतरांस कोणीहि विचारीत नाहीं. मान धनवानाला; गरिबाला नाहीं. धनवन्ताला कोणतेहि गुण खुशाल चिकटवावे; परंतु गरीब माणूस कितीहि गुणवान् व विद्वान् असला तरी धनिकांपुढें निष्प्रभ ठरतो. कोणीहि त्याला विचारीत नाहीं. 'अंतरं नैव पश्यामि निर्धनस्य मृतस्य च' मेलेला माणूस व निर्धन माणूस यांत कांहींएक फरक नाहीं.

प्राचीन काळापासून धनाची आराधना व धनाची महति गायिली जात आहे.

'अर्थस्य पुरुषोदासोदासस्त्वर्थो न कस्यचित्' असें भीष्म पितामह यांनींच सांगून टाकिलें आहे नाहीं का ?

धनाची माया ममता सर्वांनाच वाटते. असा एखादाच हरीचा लाल असतो कीं जो धनाला तृणाप्रमाणें मानून मोकळा होता. अशीं माणसें या जगांत होऊन गेलीं व सध्यांही असूं शकतील; परंतु तीं फार विरळ आहेत.

अहो ! जवळ द्रव्य असल्याशिवाय तुम्हीं कोणती गोष्ट पार पाडूं शकाल ? यज्ञ, याग करावयाचा झाला तरी द्रव्य पाहिजेच कीं नाहीं ? दानधर्म, सेवा सर्व कांहीं द्रव्यावर अवलंबून आहे.

## धन कसें मिळवावें ?

जोपर्यंत या जिवांत जीव आहे, तोंपर्यंत कशीबशी पोटाची खळगी ही भरलीच पाहिजे. आपणाला आयुष्य दीर्घकाळपर्यंत लाभलें आणि जवळचें द्रव्यमात्र संपलें; मग काय आहे त्या दीर्घयुष्याची गोडी ! त्यापेक्षां मरण काय वाईट ? यासाठीं द्रव्य संपादन केले पाहिजे व त्याचा थोडा फार संग्रहही केला पाहिजे. धन मिळविलें पाहिजे, परंतु तें कोणत्या मार्गानें ? वाटेल त्या मार्गानें नव्हे. सन्मार्गानें, प्रामाणिकपणें वागून आपण धन मिळविलें पाहिजे. आपणाला कोणीही नांव ठेऊं नये व आपलें मनही प्रसन्न राहील अशा मार्गानें आपण पैसा मिळविला पाहिजे. धनाचा लोभ बाळगावयाचा नाहीं; कोणाचेंही हपाप घ्यावयाचें नाहीं. जें शुद्ध व सरळ मार्गानें मिळवितां येईल तेवढें मिळवावयाचें.

द्रव्य व द्रव्यार्जन हा मुद्दा प्रत्येकानें विचार करण्यासारखा आहे. फार मोठें गहन तत्त्व आहे तें. धन हें सुखाचें साधन आहे हें खरें आहे का ? मग सुवर्णाच्या लंकेचा स्वामी कां बरें दुःखी झाला ? भर्तृहरी राजानें राज्यपदावर लाथ मारून अरण्यवास कां बरें पत्करिला ? आणि या प्राचीन कथा कशाला ? आजकाल आपल्या दृष्टीसमोर थोडे थोडके का कोट्याधीश आहेत ? ते दुःखी, कष्टी, रोगी व सचिंत कां आढळून येतात ?

## धनाचा तिरस्कार करून चालणार नाहीं

हा संसार चालविण्यासाठीं द्रव्य जरूर पाहिजे. त्याचा सर्वस्वी तिरस्कार करून

चालण्यासारखें नाहीं. या शरिराचें रक्षण करण्यासाठीं द्रव्याची जरुरी आहे मुंबईहून दिल्लीला जाण्यासाठीं आपणाला आगगाडीची किंवा विमानाची जरुरी भासते नाहीं का? त्याचप्रमाणें धनाला कांहीं एक ठराविक स्थान आहे. परंतु त्याचें आपण जें भलतेच स्तोम माजवितों तें फार वाईट. मानवी जीवनाचें सर्वस्व किंवा अंतिम ध्येय धन होऊं शकत नाहीं. जे तसें मानतात ते आज पश्चात्ताप करीत आहेत. अमेरिकेजवळ धनदौलत थोडी का आहे? परंतु त्या देशांतील लोकांना खरेंखुरें सुख त्यामुळें मिळत आहे का?

**धन दुर्गुणांचें पोषण करतें**

त्याचें कारण काय? कारण धनदौलत, जवाहिर, सोनें, चांदी हीं सारीं नाना प्रकारच्या दुर्गुणांस आश्रय देणारीं आहेत. काम, क्रोध, लोभ, मोह वगैरे जे दुर्गुण आहेत, त्या सर्वांना त्यामुळें थारा मिळतो. असें म्हटलें आहे कीं—

**द्रव्येण जायते कामः क्रोधो द्रव्येण जायते ।**
**द्रव्येण जायते लोभो, मोहो द्रव्येण जायते ॥**

काम, क्रोध लोभ मोहादि दुर्गुणांची उत्पत्ति धनापायीं होत असते. अहो! हेंच काय, परंतु याहिपेक्षां कितीतरी प्रकारचे अनर्थ धनामुळें निर्माण होत असतात. त्यासाठीं शहाणे लोक धनाचा त्याग करतात. तेव्हां नाना प्रकारच्या दुर्गुणांस थारा देणारें, पापाकडे प्रवृत्ति घडविणारें जें द्रव्य त्याच्यासाठीं माणसानें एवढें पागल कां म्हणून व्हावें?

**धनलोभ महाकठीण**

सध्याच्या काळीं द्रव्यार्जनासाठीं ज्या खटपटी व लटपटी चालू आहेत, त्या पाहिल्या म्हणजे मति गुंग होऊन जाते. धनतृष्णा उत्तरोत्तर वाढतच चालली आहे. धनाला जें स्थान देणें जरूर तें दिलें जात नाहीं. धन लोभ महा कठीण आहे. या लोभांतून सुटका करून घेण्याऐवजी त्याचें हरप्रकारें पोषणच केलें जात आहे. धनाची तृष्णा शांत होणें कठीण आहे. धनाची तृष्णा भागवीत गेल्यानें काम, क्रोध, लोभ, मोह आदि दुर्गुणांपासून सुटका करून घेतां आली असली तर ठीक आहे, परंतु तसें न घडतां त्या दुर्गुणांत भरच पडत जाते.

या देशांत किंवा इतर देशांत जे बडे बडे धनवान झाले, त्यांची अवस्था शेवटीं काय बरें झाली? आधुनिक काळांतील सारा इतिहास धुंडाळून पाहिला तर धनिकांच्या वाट्यास सुखासमाधानाचें मरण आल्याचें आढळून येत नाहीं ही दुर्दैवाची घटना आहे.

**धनिकांची बैठक**

१९२३ सालची गोष्ट आहे. अमेरिकेंतील शिकागो शहरांतील एका हॉटेलांत जगांतील थोर धनिकांची एक बैठक भरली होती. तेथें जगांतील सर्वांत मोठ्या लोखंड व पोलाद कंपनीचे कोट्यावधि मालक होते. गॅस कंपनी, हिऱ्यामाणकांची कंपनी, पेट्रोलियम तेल कंपनी, मोठमोठ्या बँकांचे धनी व जे जे धनवान् आहेत ते बहुतेक हजर होते. त्यांपैकीं असे असंख्य होते कीं ज्यांच्याजवळ आपली दौलत किती

आहे याचाहि त्यांना पत्ता नव्हता. असे अगणित संपत्तीचे मालक तेथें एकत्र जमले होते. त्यांनीं त्यावेळीं आपापल्या धंद्यारोजगारासंबंधीं विचार केला; परंतु कोट्यावीश किंवा अब्जाधीश असून ते सुखी नव्हते. प्रत्येकाच्या मागें कांहीं ना किंवा कुलंगडी होतीं. त्यामुळें मागाहून कोणी आत्महत्त्या केल्याचें, कोणी सरकारी तुरुंगांत जाऊन पडल्याचें किंवा अशाच कोणत्या ना कोणत्या मार्गानें अखेरी जीवन दुःखांत घालविल्याचें आढळून आलें. असें म्हटलें आहे कीं,

**अर्थस्योपार्जने दुःखमर्जितस्यापि रक्षणे ।**
**नाशे दुःखं, व्यये दुःखं धिगर्थं दुःखभाजनम् ॥**

धन कमावीत असतां, दुःखकष्ट घ्यावे लागतात, बरें तें मिळविलें तरी त्याचें रक्षण करण्याबाबत केवढी काळजी वहावी लागते! धनाचा कोणत्याही कारणानें नाश झाला असतां पराकाष्ठेचें दुःख सहन करावें लागतें; बरें, त्याचा खर्च झाला तरीहि दुःख. अशा रीतीनें जें दुःखाला कारण होणारें त्या धनाचा धिक्कार असो.

**मग करावें काय?**

परंतु तुम्हीं कितीहि धिक्कार केला, तरी आजकाल जनता धनार्जनाच्या मागें लागलेली आहे, जनता धनाची उपासना करणारी आहे. याचें कारण आरंभीं सांगण्यांत आलेलें आहेच. धनलक्ष्मीची उपासना करणाऱ्यांची गत काय होते तेंही आपण पाहिलें. अशा स्थितींत आपण काय बरें समजावयाचें? धनदौलत ˆ वाइट किंवा अनिष्ट गोष्ट नाहीं. या संसारांत आपणास धनाची व तें संपादन करण्याची जरूरी आहे. परंतु धन व धनोपार्जन हेंच आपण आपलें सर्वस्व व हेंच आपलें ध्येय असें मानून न वागतां, धनाला योग्य तें मर्यादित स्थान दिलें पाहिजे. त्या स्थानावरून त्याला हालचाल करूं न देतां तें आपल्या आटोक्यांत राहील, त्याचा विनियोग केवळ सत्कार्यार्थ होत राहील, याकडे आपण आपली दृष्टि ठेविली पाहिजे.

—'**भारती**' (हिंदी) च्या आधारें साभार


# लहान मुलाच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाला वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# संतसमागम गोड

## गुरुगोडीची महती

### ' सद्‌गुरुअनुग्रहाविण हरिला । तो कठिण सर्वथा पटणें ।

नामदेव पांडुरंगाचे परम भक्त होते. त्यांना पांडुरंगाचा नित्य सहवास असे. देवही सगुण रूपानें प्रगट होऊन त्यांच्याशी बोलत असे. आणि एकाद्या लाडक्या मुलाप्रमाणें त्यांचें कोडकौतुक पुरवीत असे; परंतु निर्गुण, निराकार परमेश्वराच्या सत्य स्वरूपाची ओळख त्यांना झाली नव्हती. शिवाय देव आपणांशीं बोलतो चालतो या विषयीहीं त्यांच्या मनांत थोडासा सात्विक अहंकार उत्पन्न झाला होता.

निवृत्ति ज्ञानदेवादि भावंडें विठ्ठलाच्या दर्शनाला आलीं म्हणजे हे तिघे बंधु नामदेवासही प्रदक्षिणापूर्वक नमस्कार करीत. नामदेवांना अगोदरच अभिमानाची बाधा झालेली, तेव्हां ते म्हणतात, ' मी नेहमी पांडुरंगाजवळ असतों. हे जसे देवभक्त तसा मीही देवभक्त. परंतु मला जसें नित्य विठ्ठलाचें सानिध्य आहे तसें यांना कोठें आहे ? तेव्हां यांनीं मला नमस्कार करावा हें योग्यच आहे, कारण माझा तसा अधिकारच आहे; पण मी मात्र यांना उलट नमस्कार करणार नाहीं. '

नामदेवाचें हे औद्धत्य पाहून मुक्ताबाईस राग आला. ती नामदेवास म्हणाली, ' तुला देवाचें नित्य सान्निध्य असून तुझा अहंकार अद्यापि गेला नाहीं. सर्वजण तुला नमस्कार करतील. पण मी मात्र हा तुझा अहंकार नाहींसा झाल्याशिवाय तुला नमस्कार करणार नाहीं. '

हे तिचें सडेतोड बोलणें ऐकून तिच्या बंधूंना वाईट वाटलें. ते तिला म्हणाले, नामदेवानें भक्तिच्या बलानें देव आपला ऋणाईत केला आहे. त्याला ज्ञानाची काय जरूरी !

मुक्ताबाई म्हणाली, ' ज्ञानशिवाम भक्ति व्यर्थ आहे. या नामदेवानें भक्तिचें नुसतें स्तोम माजविलें आहे. पण याचें हृदय अद्यापि कोरडें ठगठणींत आहे संताना मान देण्यास जो तयार नाहीं, त्यानें इतकें दिवस देवळाजवळ राहून काय केलें ?

मुक्ताबाईच्या बंधूंनीं तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला व म्हटलें, ' नामदेव वडील आहेत. त्यांचा असा उपमर्द करूं नये. त्यांना नमस्कार करून त्यांची क्षमा माग.'

पण मुक्ताई ऐकेना. ती पुढें म्हणाली, ' तें कांहीं नाहीं. यानें सद्‌गुरूचा उपदेश घेतल्यावांचून याचा अहंकार नाहींसा होणार नाहीं.'

नामदेवाचा अभिमान नाहींसा करून त्यास भगवंताच्या खऱ्या स्वरूपाची ओळख देण्यासाठीं निवृत्ति ज्ञानदेवादि संतांनीं एक प्रसंग मुद्दाम घडवून आणला.

पुढें कांहीं दिवसांनी सर्व संत मंडळी गोरोबा कुंभारांच्या घरीं जमली होती. सर्व संत त्यास 'काका' म्हणत असत. नामदेवही त्यावेळी उपस्थित होते. प्रथम कांहीं वेळ पारमार्थिक चर्चा झाल्यावर, ज्ञानदेव विनोदानें गोरोबांस म्हणाले, 'काका, या सर्व मडक्यांत पक्कीं भांडीं कोणतीं आणि कच्चीं कोणतीं याची एकदां परीक्षा करा पाहूं.'

हें ऐकून गोरोबा उठले आणि, कुंभार टिचकी मारून जशी कच्च्या पक्क्या मडक्यांची परीक्षा करतो, त्याप्रमाणें तेथें जमलेल्या प्रत्येक संताच्या डोक्यावर टिचकी मारीत चालले !

**सद्‌गुरू अनुग्रहाविण हरिला, तो कठीण सर्वथा पटणें ।**
**गोरा संत परिक्षा मस्तकी हाणूनि सर्व आपटणें ॥**

टिचकीचा आघात नामदेवाशिवाय सर्व संतांनीं निमूटपणें सहन केला. नामदेवांच्या कपाळावर काकांनीं टिचकी मारतांच, नामदेव त्यांस म्हणाले, 'काका, तुम्ही हा काय पोरकटपणा चालविला आहे? लोकांस आपल्या घरीं जमवून त्यांच्या डोक्यावर टिचक्या मारावयाच्या हा कोणत्या गांवचा आदरसत्कार ?'

"नामदेवांचें हें थोडेसें रागाचें बोलणें ऐकतांच सगळे संत हंसले व गोरोबांनीं नामदेवाकडे बोट दाखवून ज्ञानदेवांस म्हणाले कीं, "हा एवढा एक घट मात्र कच्चा आहे."

तेव्हां मुक्ताबाई गोरोबांस म्हणाली. "तुमची परिक्षा अगदीं बरोबर आहे."

हें ऐकतांच सर्व संत खदखदां हासूं लागले व त्यामुळें नामदेव मनांत फार ओशाळे झाले.

पुढें नामदेव त्या संत मंडळींचा निरोप न घेतां तेथून निघून पंढरीस आले व गोरोबांच्या घरीं झालेल्या स्वतःच्या अपमानाची सर्व हकीगत त्यांनीं पांडुरंगास सांगितली.

"जुनाट म्हातारा जालों आला ॥ मुक्ताबाईनें तेथें माजविली कळा ॥ हे संत मंडळी कपटी तुझी । नामा म्हणे देवा आणिलें पूर्व दैवें ॥ गेलों असतां जीवें सगळाचि ॥

देव म्हणाले, "नाम्या, गोरोबांनीं जी परीक्षा केली ती अगदीं बरोबर आहे. जो मनुष्य सद्‌गुरूला शरण गेला नाहीं, तो केवढाहि व्युत्पन्न आणि भक्तिमान असला तरी तो कच्चाच आहे असें म्हटलें पाहिजे."

ही भगवद्भक्ति ऐकून नामदेव म्हणाले, "देवा माझ्या अपमान दुःखाचा परिहार करशील अशा समजुतीनें मी तुजपाशीं आलों, पण तूंही गोरोबांच्याच म्हणण्याचा अनुवाद करतोस ?"

देवानें सांगितलें, 'नामदेवा, तुला इतकें वाईट वाटण्याचें कारण नाहीं, तूं आतां सद्‌गुरूस शरण जाऊन त्याचा उपदेश घे. म्हणजे माझ्या विश्वव्यापी निर्गुण स्वरूपाची यथार्थ कल्पना तुला होऊन, अद्वैताचें खरें रहस्य काय आहे हें कळून येईल.' देवानें इतकें सांगितलें तरी ते असें म्हणतात—

नामा म्हणे तुजसी। पावावया सेविजे सद्‌गुरूसी।
तो तूं रोकडा जोडिलासी। आतां सद्‌गुरूसी काय काम ॥
फळ तरुवर शिखरीं। म्हणोनि आरोहण कीजे त्यावरी।
तें फळ अवचितां जोडिलें करीं। मग त्यावरी कासया चढावें ॥

यावर देव म्हणाले, "नामदेवा तुझ्या विशुद्ध प्रेमास वश होऊन मी तुजबरोबर खोटेच मायावी खेळ खेळतों. परंतु जोंपर्यंत तुजवर सद्‌गुरुकृपा झाली नाहीं तोंपर्यंत मी स्वप्नांतल्या द्रव्यासारखा तुला आहें.'

तरी नामदेव आपला हेका सोडीनात. ते म्हणतात, 'मला परमात्म स्वरूपाचें ज्ञान नाहीं हें तुला कोणी सांगितलें ? तूं जरी वाटेल तें स्वरूप धारण करून आलास, तरी मी तुला ताबडतोब ओळखीन!'

'ठीक आहे' असें म्हणून देवानें सांवता माळ्यांच्या साक्षीनें नामदेवाची परीक्षा घेण्याचें ठरविलें व त्या प्रमाणें विठ्ठलानें त्या दोघांस एका जागीं जाऊन बसण्यास सांगितलें.

देवाच्या सांगण्याप्रमाणें दोघेही तेथें जाऊन देवाची वाट पाहत बसले. इकडे देव मलंगाचें रूप धारण करून बरोबर कंथा, सैली, उंच टोपी, कुंडी व काठी घेऊन डावे खाकेंत भिक्षेची झोळी, तसेंच बरोबर एक कुत्री (कामधेनु) व उजवे हातांत धूम्रपानमंत्र घेऊन मार्गानें सवाल करीत चालले. ते सवाल ऐकून नामदेवास, हा कृतांत आहे कीं काय असें वाटून तो फार भयभीत झाला. व आतां देव भेटीस येण्याची वेळ झाली आणि मध्येंच हा काय अनर्थ येत आहे.

असें बोलतो तों मलंगाची स्वारी जवळ आली. त्यास पाहून सांवत्यांस फार आनंद झाला. परंतु नामदेव मलंगास म्हणाले, "तुम्ही गांवाकडे जावयाचें सोडून इकडे कशास आलां ? मलंगानें उत्तर दिलें, "मला फार भूक लागली आहे. तेव्हां येथें बसून थोडीशी रोटी खाऊन मग गांवांत जाईन" असें म्हणून तो ज्या ठिकाणीं नामदेव व सांवता हे बसले होते तेथें जवळच आपलें आसन टाकून बसला. मग सांवत्यास त्यानें विचारलें, "तुम्ही कोण व तुमचें नांव काय ?"

सांवत्यानें उत्तर दिलें, 'मी माळी आहें. माझें नांव सांवता.'

मग मलंगानें नामदेवांसही तोच प्रश्न विचारला. तेव्हां त्यांनीं 'माझी जात शिंपी व माझें नांव नामदेव आहे' असें सांगितलें. तें ऐकून मलंग म्हणाला, 'देवावर भक्ति नाहीं आणि नामदेव म्हणवितोस; त्यापेक्षां नुसतें नामा हेंच नांव ठीक दिसतें. नामा, तुला थोडी गुरुगोडी (गुडगुडी) पाहिजे ?'

नामदेव म्हणाले, 'नको.'

मलंग म्हणाला, 'तुझ्या नशिबांतच नाहीं त्याला तूं तरी काय करणार ?'

नामदेव मनांत म्हणाले, 'या अविंधास वेड तर लागलें नाहीं ? मला धर्मभ्रष्ट करावयाचें यांच्या मनांत आहे वाटतें.'

मलंग सांवता माळ्यास म्हणाला, 'नाम्याला गुरुगोडी नको. तूं तरी थोडीशी घेतोस ?'

सावत्यांनीं उत्तर दिलें, 'मी तर गुरुगोडी घेतली आहे. तिजवांचून मला घटकाभर देखील करमत नाही.' मलंग म्हणाला, 'काय, तूं गुरुगोडी घेतली आहेस कीं खोटें बोलतोस ?'

याप्रमाणें बोलणें झाल्यावर मलंगानें एक सानक ( भिक्षापात्र ) काढिली, तींत भिक्षा मागून आणलेले भाकरीचे तुकडे घातले, व जवळच कुत्री बसली होती, तीस म्हणतो, 'अगे, मला दूध दे.' तेव्हां ती लागलीच उभी राहून तिनें त्या पात्रांत इतकें दूध सोडलें कीं, त्याचा लोट पात्र भरून दहा वीस हात लांब गेला !

हें पाहून नामदेवांस मोठें आश्चर्य वाटलें. ते आपल्याशींच म्हणाले, ही कुत्री दिसावयास तर फार लहान दिसते; पण दूध तर गाई म्हशीपेक्षांहि जास्त देते.'

इकडे मलंगाने दूध व तुकडे याचा काला करून नामदेवास म्हटलें, बेटा, थोडा प्रसाद घेतोस ?'

नामदेव म्हणाले, 'तुमचें चालूं द्या, मला नको.'

मग मलंगानें तीच गोष्ट सांवता माळ्यांस विचारली. तेव्हां ते तो प्रसाद ग्रहण करण्यास मोठ्या आनंदाने तयार झाले. कारण, त्यांनीं मलंगाचें खरें स्वरूप ओळखलें होतें. सांवता माळी प्रसाद घेण्यास पुढें सरसावले तों नामदेवांनीं त्यांचा हात धरून त्यास म्हटलें, 'थेरड्या, चाललास कोठें ? कुत्रीच्या दुधांत कालवलेले यवनाच्या हातचे भाकरीचे तुकडे खाऊन तुला बाटावयाचें आहे काय ?' सांवत्यांनीं उत्तर दिलें, 'हें सुंदर दूध तर मला खावेसें वाटतें बुवा !'

नामदेव म्हणाले, "सांवत्या तूं जेवलास तर तुझ्या मंडळींत या गोष्टीचा मी बोभाटा करीन."

सांवता म्हणाला, "नाम्या, असें काय करतोस ? मला या दुधाचा मोह अगदीं आवरत नाहीं, म्हणून थोडेसें खातों. तरी कृपा करून ही गोष्ट तूं कोणापाशीं बोलूं नकोस."

नामदेवांनीं स्पष्ट सांगितलें, "आपण तर ही गोष्ट प्रसिद्ध केल्याशिवाय राहणार नाहीं."

सांवत्यानीं नामदेवांचा हात झिडकारून, "जा, आतांच जाऊन सांग !" असें म्हटलें व ते मलंगाजवळ येऊन बसले. तेव्हां मलंग सांवत्याचें मुखीं व सांवता मलंगाचें मुखीं ग्रास देऊं लागले. तो देखावा पाहून नामदेवांचे अंगांत शिसारी आली. निराशेनें दीर्घ निश्वास सोडून ते उद्गारले, "हर ! हर ! आतां मात्र कलीयुग खचित सुरू झालें !"

इकडे मलंगानें सांवत्याच्या कानांत सांगितलें, 'तूं नाम्यास चुचकारून इकडे आण; म्हणजे आपण त्यास खालीं पाडून त्याच्या मुखांत बळेंच घांस घालूं.'

या त्यांच्या गुप्त भाषणामुळें नामदेवांस अशी शंका आली कीं, हे दांडगे धटिंगण कदाचित् आपणांस जबरीनें बाटवितील, तेव्हां येथून पळून जावें हें बरें. असा विचार

करून त्यांनी एकदम धूम ठोकली. तें पाहून मलंग, 'पकडो पकडो,' म्हणून ओरडूं लागला. त्या गडबडींत नामदेव अडखळून खालीं पडले, पण लगेच कसे बसे उठून एकदांचें देऊळ गाठलें. पळतां पळतां दमल्यामुळें त्यांस धड बोलतांही येईना. ते धापा टाकीत उभे राहिले.

पांडुरंगानें त्यांस विचारलें, 'नाम्या असें झालें आहे तरी काय ?'

नामदेव म्हणाले, 'देवा काय सांगूं, एक मुसलमान फकीर मला कुत्रीचें दूध पाजून जबरदस्तीनें बाटविणार होता, परंतु मोठ्या मुष्किलीनें मी त्याच्या हातून सुटलों.'

देवानें विचारलें, कायरे, त्या फकीरानें आणखी काय केलें ?'

नामदेव म्हणाले, 'त्यानें सांवत्यास बाटवून मुसलमान केलें, आणि तेवढ्यांत मी पळून आलों. आतां सांवत्यास राऊळांत येऊं देऊं नकोस.' हें ऐकून देव मोठ्यानें हंसला व त्यानें आपण स्वतःच मलंग झालों होतों व कुत्री कामधेनु होती वगैरे हकीकत नामदेवास सांगितली.

आश्चर्यचकित होऊन नामदेव म्हणाले, 'देवा तूं हें असलें भलतेंच अमंगळ स्वरूप घेतोस हें काय ?' देवानें सांगितलें माझी माया विचित्र आहे. सद्गुरूच्या उपदेशाशिवाय या गोष्टींचें ज्ञान तुला होणार नाहीं.'

नामदेव म्हणाले. 'या वेळीं मी तुझी माया ओळखली नाहीं खरी, पण पुन्हां मात्र मी असा फसणार नाहीं.' देवानें तें मान्य केलें आणि आणखी दोन वेळां नामदेवांची परीक्षा पाहिली. एकदां देवानें पठाणाचें रूप घेऊन नामदेवास भिववून सांवत्यास बिगारीस धरून नेलें व दुसऱ्यांदा कुष्टरोगी मनुष्याच्या स्वरूपांत देव नामदेवापुढें आले. दोन्ही वेळां नामदेवांनीं देवास ओळखिलें नाहीं.

अखेर नामदेव लज्जित होऊन त्यांचा अहंकार साफ गळून गेला. देवाच्या अनुज्ञेप्रमाणें प्रमाणें विसोबा खेचर यांच्याकडे जाऊन त्यांनीं उपदेश घेतला व ते कृतार्थ झाले. ईश्वराच्या सत्यस्वरूपाची त्यांना ओळख पटली. गुरुगोडीची आवश्यकता त्यांना कळून चुकली, गुरुगोडीची गोडी कशी अवीट आहे हें त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास

**सद्गुरु सारिखा सोइरा जिवलग। तोडिला उद्वेग संसारींचा ॥ १ ॥**
**काय उतराई होऊं कवण्या गुणें। जन्मा नाहीं येणें ऐसें केलें ॥ २ ॥**
**माझें सुख मज दाविलें डोळां। दिधली प्रेमकळा नाममुद्रा ॥ ३ ॥**
**डोळियाचा डोळा उघडिला जेणें। लेवविलें लेणें आनंदाचें ॥ ४॥**
**नामा म्हणे निकी सांपडली सोय। न विसंबे पाय खेचराचे ॥ ५ ॥**

**सुखाचा सुखतरू सद्गुरु खेचर। स्वरूप साक्षात्कार दाखविला ॥ १ ॥**
**विठ्ठल पाहतां मावळलें मन। ध्यानीं भरले नयन तन्मय झाले ॥ २ ॥**
**निमालें मी माझें होतें तें मजपाशीं। जळें जळ गिळिलें जयापरी ॥ ३ ॥**
**तेथें आनंद आनंदु बोळला परमानंदु। नाम्या झाला बोधु विठ्ठलनामें ॥ ४ ॥**

———

# आजचा मानव व त्याचा धर्म

**आजचा मानव धर्माला विसरत चालला आहे, तो सुखोप-भोगाच्या मागें लागलेला आहे. जगभर वाराच तसा वाहात आहे. कितीही सुखोपभोग भोगले तरी तृप्ति होत नाहीं, सुख भोगांत नाहीं शाश्वत सुख त्यांच्या त्यागांत आहे, गीतेंत भगवंतानीं मानवधर्माची बरोबर कल्पना करून दिली आहे.**

विषयोपभोग तसेच केवळ सुख व चैन यांच्यामागें लागलेल्या माणसाचा सहवास शक्य तों टाळावा तो हानीकारक असतो. ज्याच्या ठिकाणीं आसुरीभावना जास्त प्रमाणांत, तोच केवळ विषयसुखाच्या व चैनबाजीच्या मागें लागत असतो. अशा माणसाचा सहवास कां टाळावा? आंधळयानें आंधळयाची संगत धरली तर केव्हां तरी दोघेही खड्डयांत जाऊन पडणार ! आंधळयानें डोळसाचा सहवास करणें इष्ट असतें.

## चार पुरुषार्थ

आमच्या सुविचारी शास्त्राकारांनीं चार प्रकारचे पुरुषार्थ सांगितले आहेत. धर्म, अर्थ, काम व मोक्ष. या सर्वांत महत्त्व देण्यांत आलें आहे धर्माला. आणि खरोखर सान्य पुरुषार्थांत धर्माचें महात्म्य विशेष आहे. यापैकीं प्रत्येक गोष्ट करावयाची ती धर्माला प्राधान्य देऊन. अधर्मानें, अन्यायानें कोणतीहि गोष्ट साध्य करावयाची नाहीं.

प्रत्येकाला पोटापाण्याची व्यवस्था करावयाची असते. ती अल्प प्रयासानें व सुगमतेनें व्हावी यासाठीं पूर्वकालीन समाजधुरिणांनीं शास्त्राधारें चार वर्णांची व्यवस्था केली. परंतु आजच्या जमान्यांत ती वर्णव्यवस्था नष्ट झालेली आहे. आजचें युग चढाओढीचें आहे. एक काळ असा आला कीं, इंग्रजी शिकलें म्हणजे नोकरी मिळते. नोकरी मिळाली म्हणजे पोटापाण्याची सोय होते. चारी वर्णांतील लोक आपापले रोजगार धंदे सोडून लागले इंग्रजी शिकायला! परन्तु त्याच एकमेव ध्येयाच्यामागें लागलेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी नोकऱ्यांसाठीं धडपडूं लागल्या. किती जणांस नोकऱ्या देणार? नंतर आज असा एक काळ येऊन ठेपला कीं, नोकऱ्या फार कमी व नोकऱ्यांसाठीं धडपडणारे लोक बेसुमार असंख्य ! वाढली बेरोजगारी !

## माणसांत व इतर प्राण्यांत फरक

आज पोटाच्या उद्योगासाठीं केवढा संघर्ष करावा लागत आहे; नही पोटापुरतें मिळविणें अनेकांस कठीण झालें आहे. हा एक [illegible]
काल प्रत्येक बाबतींत हाच प्रकार दिसून येत आहे.

मनुष्यप्राणी व इतर प्राणी यामध्यें आहार विहार वगैरे बाबतींत साम्य दिसून आलें तरी एक मोठें अंतर आहे. मनुष्याला ईश्वरानें विचारशक्ति दिली आहे. बुद्धि

दिली आहे. तिचा बरावाईट उपयोग त्याला करून घेतां येतो. माणसानें त्या बुद्धीचा सदुपयोग केला पाहिजे. त्याऐवजीं दुरुपयोग करून आहारविहार, भोगविलास यामध्येंच तो आपलें जीवन खर्च करूं लागला तर त्याला 'माणूस' ही उपमा कशी द्यावयाची? मग पशूंमध्यें व त्याच्यामध्यें अंतर तें काय राहिलें?

एवढ्यानें काय झालें? हा मानवपशु कधीं कधीं रानटी व हिंस्त्र पशूंवरही ताण करीत असतो! पशु झाले म्हणून काय झालें? ते आपापले स्वभावगुण सोडणार नाहींत. त्या गुणांचें उल्लंघन सहसा करणार नाहींत. उदाहरणार्थ, घोडा घ्या. तो आपला स्वभाव विसरून किंवा सोडून वाघाप्रमाणें क्रूर बनणार नाहीं; त्याचप्रमाणें वाघ आपला क्रूरपणा सोडून शेळी बकरीप्रमाणें शेळपटपणा करणार नाहीं. परंतु माणसाचें पहा! तो गाईप्रमाणें शेळपट बनेल व वाघाप्रमाणें हिंसक व क्रूरही बनेल. तो असुराप्रमाणें, राक्षसाप्रमाणेंहि वर्तन करूं शकतो.

## आपलें अंतिम ध्येय?

डार्विन, फ्राईड यांसारख्या पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं मनुष्य प्राण्यासंबंधानें नाना प्रकारचे तर्कवितर्क रचिले आहेत. मनुष्यानें सुखोपभोगांत आयुष्य घालवावें व जिवाची चैन करावी; बाकी गोष्टींचा विचार करण्याची जरूरी नाहीं. याच विचार प्रवाहांत पाश्चात्य राष्ट्रांतील लोक वहात चालले आहेत.

शरीररक्षणासाठीं खाणेंपिणें जरूर आहे. परंतु तें न्यायनीतीनें मिळवून जरूर तेवढेंच उपभोगावयाचें. हें जीवन केवळ खाण्यापिण्यासाठीं नाहीं. केवळ चैनीसाठीं नाहींच नाहीं. या जिवाचें रक्षण करावयाचें तें कशासाठीं? तें ईश्वर प्राप्तीसाठीं. त्याला प्राप्त करून घेऊन या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून एकदांची सुटका करून घ्यावयाची हें आहे आपलें अंतिम ध्येय.

कबीरानें हें अगदीं एका सूत्रांत सांगितलें आहे.

**साई इतना दीजिये जामें कुटुंब समाय**
**मैं भी भूखा ना रहूं साधु न भूखा जाय**

असें आहे आमच्या धर्माचें लक्षण. तें त्यागप्रधान आहे, भोगप्रधान नाहीं. अहो! सुखोपभोग पाहिजेत; परंतु त्याला अंतपार कांहीं आहे कीं नाहीं? तें अमर्याद आहे अशा वृत्तीच्या मनुष्य तृप्त कधींच नसतो. समाधानी केव्हांही नसतो. दुसऱ्याला लुटून, दुसऱ्यांचे गळे कापून कशीतरी आपली सुखभोगलालसा पुरी करावयाची. भोगाला मर्यादा नाहीं हें सांगितलें. ती कमी होण्याऐवजीं वाढतच जावयाची. त्यामुळें आज माणसामाणसांत, देशदेशांत शत्रुत्व उत्पन्न झालें आहे. शांतता कुठेंही नाहीं. सर्वत्र अशांततेचें वातावरण, जरा डोळे उघडून पहा ना आजुबाजूला!

मनाला येईल तसें वागायचें; मनाचा वारु स्वैर उधळून लावायचा, हें आजच्या जगांत चाललें आहे. आमच्या ऋषी मुनींनीं इंद्रियांवर व मनावर संयम ठेवायला सांगितलें यांतील रहस्य ओळखलें पाहिजे.

## गीतेचा आदेश

इतर सर्व शास्त्रें क्षणभर बाजूला ठेवून आपण आपला महान् ग्रंथ गीता ही काय सांगते हें जरूर पाहिलें पाहिजे. गीतेच्या सोळाव्या अध्यायांत भगवंतांनीं आसुरी मानवांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. तीं आपण विचारांत घेतलीं तर जिकडे पहावें तिकडे आसुरी प्रवृत्तीच आजकाल कशी बोकाळली आहे तिचें प्रत्यंतर येईल. यथेच्छ वाटेल तसें आचरण करणाऱ्यांचें जीवन केव्हांहि सुखी होऊं शकत नाहीं. ते यशस्वीहि होऊं शकत नाहींत. मग आपल्या जीवनाचें कर्तव्य कोणतें ?

**तस्माच्छात्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥**

मनुष्याचें मनुष्यत्व कशांत आहे ? शास्त्राच्या मर्यादेंत राहून सदाचारपूर्वक जीवन घालविणें यामध्येंच आहे. 'मनःपूतं समाचरेत्'— मनाला येईल तसें व मन सांगेल तसें वागणें म्हणजे आसुरी—राक्षसी वागणें होय. त्याचा आपण त्याग केला पाहिजे. आणि तरच मनुष्य जन्माला आल्याचें सार्थक.

—*—

# असहिष्णुता !

असहिष्णुता म्हणजे धर्माला लागलेली कीड ! धर्माच्या नांवानें आजवर किती जणांचीं टाळकीं फुटलीं आहेत ! असहिष्णुतेपुढें कोणालाहि हात टेकावे लागतात. एका शिवभक्ताची गोष्ट मी ऐकिली आहे. त्याचें नांव होतें घंटकर्ण. तो शिवाचा अगदीं एकनिष्ठ म्हणजे एकांगी भक्त होता. देव म्हणजे शिव आणि शिव म्हणजे देव. त्याला दुसरें दैवत माहीत नव्हतें व तें मानण्याचीहि त्याची तयारी नव्हती. त्याची शिवभक्ति इतकी प्रखर होती कीं, दुसऱ्या कोणत्याहि देवताचें नांव घेण्याची किंवा ऐकण्याची त्याची तयारी नव्हती. कोणी शिवाशिवाय दुसऱ्या देवाचें नांव घेऊं लागला तर तें आपल्या कानांत पडूं नये म्हणून त्यानें दोन्हीं कानांजवळ दोन घंटा बांधून ठेविल्या होत्या. त्या त्यानें मोठमोठ्यानें घणघण वाजवाव्या ! त्याचें घंटकर्ण नांव पडलें होतें तें उगाच नाहीं.

भक्ताची काळजी वहाणाऱ्या शंकराला आपल्या भक्ताची ही अंधश्रद्धा घालवायची होती. त्यासाठीं एके दिवशीं त्यानें एक उपाय योजला. घंटकर्ण हा एकदां पूजा संपवून आपल्या शिवदेवाला धुपारती ओवाळीत होता. इतक्यांत त्याच्या समोरची मूर्ति अर्धी विष्णूची व अर्धी शिवाची झाल्याचें त्याला आढळून आलें. विष्णु व शिव हे दोन नाहींत. ते एकच आहेत हें देवाला दाखवून द्यावयाचें होतें; परंतु घंटकर्ण कसला चिवट ! त्यानें काय करावें ? विष्णूच्या नाकांत धुपाचा सुगंध जाईल त्यानें म्हणून त्याचें नाकच त्यानें कापून टाकिलें !

हा माणूस सुधारण्या पलिकडचा आहे; त्याच्या वाट्यास जाण्यांत अर्थ नाहीं अशी देवानें स्वतःची समजूत करून घेतली ! आणखी दुसरें काय करणार ?

—विवेकानंद

२०



# भक्तीचा महिमा

**श्रीरामकृष्ण परमहंस यांची आमच्या वाचकांस नव्यानें ओळख करून देण्याची जरूरी नाहीं. त्यांचीं बोधवचनें अमृत-रसानें ओथंबिलेलीं आहेत. भारताचे माजी अध्यक्ष श्री. सी. राजगोपालाचारी यांनीं तो अमृतकलश चाखलेला आहे. स्वतः चाखून इतरांसही त्याचा अंशभाग मिळावा या हेतूनें त्यांनीं आपल्या तामीळ भाषेंत त्या बोध वचनांचें निरूपण 'श्रीरामकृष्ण उपनिषधम्' या नांवानें प्रसिद्धिलें. आतां त्याचें इंग्रजी भाषांतरही प्रसिद्ध झालें असून त्याच्याच आधारें आमच्या वाचकांसाठीं त्यांतील एक अमृत तुषार येथें शिडकावण्यांत येत आहे.**

**—आप्पाराव**

भगवान् रामकृष्ण आपल्याजवळ बसलेल्या एका शिष्याशीं बोलत होते. 'हें पहा! आपल्यासमोर बसलेला तूं मला पहात आहेस. परंतु मी माझ्यासमोर कापडाचा पडदा धरला तर मी तुला दिसेन का? नाहीं दिसणार. मी पडद्यामुळें दडला जाईन; परंतु पडद्यामागें जरी मी दडला गेलों असलों तरी मी पूर्वींप्रमाणें तुझ्या जवळच आहें. पडदा–ओढला गेल्यामुळें मी जवळ असून तुझ्या डोळ्यांना जवळ नसल्यासारखा झालों आहें. त्याचप्रमाणें ईश्वर तुझ्याजवळ आहे, माझ्याजवळ आहे व सर्वत्र आहे. दुसऱ्या कोणत्याही वस्तूपेक्षां ईश्वर आमच्या अगदीं निकट आहे. परंतु आपल्याआड आलेल्या अहंकाराच्या पडद्यानें त्याला दडवून ठेविलें आहे. तुम्हीं तुमच्या डोळ्यांवर लहानसा कपड्याचा तुकडा घेतला तरी भव्य पर्वतही तुम्हांला दिसणार नाहीं. जोंपर्यंत अहंकाराचा किंवा गर्वाचा पडदा आम्हीं आमच्या डोळ्यावर ओढून घेऊं, तोंपर्यंत परमेश्वर आमच्या दृष्टीस पडणार नाहीं. तो मी–पणा, तो अहंकार तुमच्यांतून नाहींसा झाला म्हणजे पहा ईश्वर आपल्या आत्यंतिक तेजस्वीतेनें तुम्हांला दिसेल. हें गणितच तसें आहे.

जो परमेश्वराच्या कृपाकटाक्षाला पात्र होतो तो प्रत्येक गोष्ट त्याच्या नांवानें व त्याच्यासाठींच करीत असतो, तसेंच जी जी घटना घडते ती ती म्हणजे केवळ परमेश्वरी लीला आहे असें त्याला वाटूं लागतें. आणि ही जाणीव ज्यावेळीं त्याच्या जीवनांत निर्माण होते, त्यावेळीं तो जीवन मुक्त बनतो. मृत्यूच्या तावडींत सांपडण्यापूर्वीच त्याच्या शरीराला मुक्ति मिळालेली असते. भयभीति किंवा दुःख, क्षोभ त्याच्या वाऱ्याला उभीं रात नाहींत.

जो भगवंताचा सच्चा भक्त असतो तो स्वतःला एका गोष्टीचें नेहमीं स्मरण देत असतो. तो म्हणत असतो कीं, हे भगवंता, जें जें कांहीं घडतें तें केवळ तुझ्यामुळेंच. मी कांहीं करूं शकत नाहीं. मी तुझ्या हातांतील केवळ खेळणें आहें. मी कोणतीही गोष्ट करायला प्रवृत्त होतों तो केवळ तुझ्याचमुळें. जें जें सभोंवार दिसतें तें तुझेंच वैभव व तुझीच लीला आहे. मी रहातों हें निवासस्थान आणि हे कुटुंबीजन यांपैकीं माझें असें कांहीं नाहीं. हें सारें तुझें आहे. तुझी आज्ञा पालन करणारा मी तुझा एक सेवक आहें. तुझी आज्ञा पाळणें व तुझी सेवा करणें हेंच माझें पवित्र कर्तव्य व त्यांतच मला आनन्द. अशा रीतीनें वारंवार स्वतःला जाणीव करून देत आम्हीं आमचें जीवन भक्तिभावपूर्वक घालवूं लागलों तर आमच्या अहंकाराची, मीपणाची जी दाट छाया पडलेली असते, जो पडदा ओढला गेलेला असतो, तो दूर होईल आणि मग आम्हांला दिव्यत्वाचा लाभ घडेल.

हा 'मी' जो आहे तो दोन प्रकारचा आहे. परिपक्व झालेल्या भक्तिभावामुळें होणारी मीपणाची जाणीव व अपरिपक्व अहंकाराची जाणीव. ही जी दुसरी जाणीव किंवा भावना सांगितली तिच्याशीं हें माझें घर, हीं माझीं मुलें, ही माझी बायको, हें माझें शरीर, ही माझी मालमत्ता यासारख्या भावना निगडित झालेल्या असतात. त्यांनींच आमच्या दृष्टीसमोर पडदा ओढलेला असतो व त्यामुळें भगवंताला आम्ही पाहूं शकत नाहीं.

भक्ताचा मार्गच वेगळा असतो. तो स्वतःला क्षणोक्षणीं बजावीत असतो कीं, देवाच्या इच्छेनुसार वागणें या पलिकडे मी दुसरें कांहीं जाणत नाहीं. जें जें कांहीं दिसतें तें सारें त्याचें. माझें असें कांहीं नाहीं. हें वैभव सारें त्याचें आहे. मी केवळ त्याचा सेवक आहें. त्याची सेवा करीत जीवन घालविणें हाच माझा आनंद. अशा प्रकारचें जीवन जो घालवूं शकतो, त्याचा अहंकार पिकून तो गळून पडतो–नाहींसा होतो आणि असा जो भक्त तो जीवन्मुक्त बनतो.

परंतु एक गोष्ट लक्षांत बाळगली पाहिजे. मीपणापासून सहजासहजीं कोणाचीही सुटका होऊं शकत नाहीं. तुमची बुद्धिमत्ता व तुमचा अद्वैतभाव कितीही मोठा व व्यापक असला तरी तो तुमच्या उपयोगी पडूं शकत नाहीं. मनुष्यानें स्वतःला सर्वस्वी देवाचा सेवक बनवून घेतलें पाहिजे, व तदनुसार कटाक्षपूर्वक वागलें पाहिजे. भक्ताचा अहंकार हा अपवित्र नसतो. बालकाचा अहंकार निष्पाप असतो ना तसाच; परंतु आम्हीं ज्या अहंकाराचा नाश करावयाचा असतो तो अविचारी अहंकाराचा. भक्तामध्ये जो मीपणाचा लवलेश असतो तो त्याला देवाच्या चरणाप्रत पोहोचवूं शकतो. भक्तिमार्गानें जाणाऱ्याच्या अंतःकरणांत अहंकाराचा लवलेश असला तरी तो देवाचा दास या नात्यानेंच वावरत असतो. तो आड येऊं शकत नाहीं. त्यासाठी भक्तिमार्ग हा खात्रीलायक व उदात्त मार्ग आहे.

× × ×

ज्या भांड्यांत गार्लीक आसिड् असतें तें नंतर कितीहि धुतलें तरी त्याचा वास कांहीं केल्या नाहींसा होत नाहीं. अहंकार या दुर्गुणाचेंही तसेंच आहे. त्याच्यापासून सुटका करून घेण्यांत यश मिळविणें, अनेकांच्या बाबतींत फार कठीण असतें. अहंकाराला आस्ते आस्ते भक्तिमार्गाची जोड करून देण्यांत आली, मनुष्य भक्तीची कांस धरून वाटचाल करूं लागला व अहंकारावर नजर ठेऊन प्रत्येक पाऊल सावधानतेनें पडूं लागलें म्हणजे तोच अहंकार हळुहळू नामशेष होऊं लागतो.

× × ×

कोणी एक नामांकीत डॉक्टर एकदां एका घरीं आजारीपणानें पिडलेल्या बालकास पहाण्यासाठीं आला. त्याला तपासल्यानंतर तो बालकाच्या आईला म्हणाला, 'कांहीं चिंता करण्याचें कारण नाहीं. मी या बालकाचा रोग हटवीन व त्याला बरा करीन. त्याला बरा करण्याची व जीवन देण्याची जबाबदारी माझ्या शिरावर आहे असें समजा.'

भगवान् रामकृष्ण म्हणतात, 'जेव्हां एखादा डॉक्टर अशा प्रकारची बढाई मारतो तेव्हां देव मनांतल्या मनांत हंसतो. या जीवनाचा संरक्षक व मालक कोण! देवच, डॉक्टर नाहीं. प्रत्येकाच्या जीवनाची चावी त्यानें आपल्या हातीं ठेविली आहे.

दोघे भाऊ होते. कुटुंबांत आपण एकत्र राहूं शकत नाहीं असें आढळून आल्यावरून त्यांनीं आपली जमीन विभागून घेण्याचें ठरविलें. वडील भावानें फूटपट्टी हातांत घेतली व सर्व जमिनीचें मोजमाप केलें व तो आपल्या धाकट्या भावास म्हणाला, 'अरे हें बघ, हा जमिनीचा तुकडा तुझा व हा माझा!'

श्रीरामकृष्ण म्हणतात, 'असल्या मूर्खांचे हें वागणें पाहून देव हंसतो. देव हंसेल नाहींतर दुसरें काय बरें करील? म्हणे हें माझें आहे! कसला अर्थ आहे त्या अहंकारांत! जेथें तुम्हींच सर्वस्वीं असहाय्य अहांत, क्षणभंगुर आहांत, तेथें हें माझें आणि हें तुझें, या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे का?

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे; आणि ती घडून आली आहे पाश्चिमात्य देशांत. एका शहरांत एक तरुण खिस्ती भक्त होता. तो एका मठांत रहात असे. तो काय करीत असे? त्या मठांत जे कोणी भगवद्भक्त रहात असत, त्यांच्यासाठीं जेवण तयार करून तें त्यांना वाढावयाचें व त्यांची मनोभावे परोपरीनें सेवा करावयाची. तो शिकला सवरलेला किंवा इतराप्रमाणें विद्वान् नव्हता. तो तरुण होता. आणि तरीही त्याचें अंतःकरण शुद्ध होतें. शुद्ध भावनेनें तो त्या मठांतील संतांची सेवा-चाकरी करीत होता. तो स्वयंपाक करी, भांडीं साफसूफ करी, कपडेलत्ते धुवून स्वच्छ करी; परन्तु जें जें कांहीं करी तें तें देवाची सेवा या भावनेनें करी. त्याचा सारा वेळ त्यांतच खर्च होई. त्याला देवाची प्रार्थना करायला वेळच रहात नसे व त्यासाठीं जरुर असलेली एकांत जागा त्याच्या वाट्याला आली नव्हती. मात्र त्याला वाटत असे कीं देव आपल्या सांगाती अहर्निश आहे. आपण कुठेंही असलों व कोणतेंही काम करीत असलों तरी देव आपल्याजवळ आहे ही त्याची भावना होती. 'जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती.'

# संसाराला कंटाळून कसें चालेल?

************************************

**आपण संसारी माणसें. संसारांत वावरावें लागतें. तेथें सुखदुःखाचे चटके वारंवार बसतात. मन कष्टी होतें. असा हा संसार आपल्यामागें कां लागला आहे, याचें सुंदर स्पष्टीकरण श्री साईबाबा यांनी केलें आहे. याला आधार ह. भ. प. दासगणू महाराज यांचें 'अर्वाचीन भक्त व संत लीलामृत.'**

शिरडी येथें साईबाबांच्या दर्शनासाठीं एकदां नानासाहेब चांदोरकर हे आले असतां त्यांनीं नेहमींप्रमाणें त्यांच्या पायांवर आपलें मस्तक ठेविलें व हात जोडून म्हणाले, "महाराज, मला आतां या संसाराचा वीट आला आहे. या बंधनांतून मला एकदांचे मोकळे करा. संसार हा निःसार आहे असें सर्व शास्त्रें सांगत आलीं आहेत; मग त्यांत राहून काय बरें उपयोग? मला या संसार तापांतून मोकळा व्हायचें आहे. ही माझ्या पायांतील बेडी आपण कृपाळू होऊन तोडून टाका. जों जों सुखाची हांव धरावी तों तों तें दूर पळतें व दुःख मात्र पाठीशीं लागतें. आशा तर नाचवीत आहे एकसारखी. ही आशा कांहीं केल्या सुटत नाहीं. संसारांत कितीही शोधून पाहिलें तरी सुखाचा लवलेशही हाताला लागत नाहीं. उगाच त्यासाठीं धडपडत मात्र रहावयाचें. मी तर आतां अगदीं कंटाळून गेलों आहे या संसाराला! यापुढें मला त्याचा संबंध नको!"

बाबानीं नानासाहेबांची ही विनवणी अत्यंत शांतपणें ऐकून घेतली. किती बोलता-हेत तेवढें बोलू द्या. त्यांचा एकदां ओघ थांबू द्या; मग पहातां येईल, अशा विचारानें

---

अशी त्याची भावना झालेली होती. आणि खरोखर देव त्याच्या अगदीं सन्निध होता. तो त्याचा सदासर्वकाळ सोबती होऊन राहिला होता. त्याला असें निश्चितपणें वाटे. त्याला वाटे कीं देव माझ्याबरोबर खातो पितो, माझ्याबरोबर झोपतो, माझ्याबरोबर कामकाज करतो व माझ्याबरोबर खेळतोहि.

त्या मठांत जे इतर भक्त होते त्यांना त्याचा सदासर्वकाळ आनंदी स्वभाव व भक्तिभाव पाहून खरोखर आश्चर्य वाटत असें. तें त्यांचें चिरंतन काळ आश्चर्य होऊन राहिलें होतें. त्याचें नांव होतें लॉरेन्स. या लॉरेन्सच्या जीवनांतील ही घटना जेव्हां आमच्या दृष्टी समोर येते तेव्हां वृंदावनांतील गोपींची व श्रीरामकृष्णाच्या समर्पित जीवनाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

प्रत्येक देशांत व प्रत्येक कालखंडांत अशा प्रकारचे थोर महात्मे जीवन्मुक्त होऊन गेले आहेत. त्यानीं प्रत्यक्ष भगवंताला आपल्या जीवनांत डोळे भरून पाहिलें आहे.

———

बाबा त्यांच्याकडे पहात होते. त्यांचें बोलणें संपल्यानंतर बाबा त्यांना उद्देशून हंसत मुखानें म्हणाले, " अरे वेड्या, हें मोहक ज्ञान आणि हे विचार तुझ्या डोक्यांत कुठून आले ? वरकरणी पहातां तुझें बोलणें खरें आहे. त्यांत तथ्यांश नाहीं असें नाहीं, परंतु तुझ्याकडून थोडी चूक घडत आहे बाबा ! जोंपर्यंत या देहांत देह आहे तोंपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत संसारचक्र आपल्या पाठीशीं लागलेलें असतें. तो कोणालाही चुकलेला नाहीं. त्यानें आपला पगडा सर्वांवर बसविला आहे. मग तुझी तरी त्यांतून कशी बरें सुटका व्हावी ? तो सोडीन म्हटल्यानें सोडतां येत नाहीं. अरे वेड्या ! तुझें काय ? मीही त्यांत सांपडलों आहें. मलाही त्यांतून सुटका करून घेतां येत नाहीं; मग मी तुझी कशी बरें सुटका करणार ? हें बघ, संसाराचीं नाना रूपें आहेत. तींच मी आतां तुला सांगणार आहे.या देहावर संसाराची छाया कायमची पडलेली आहे.काम,मोह, मद, मत्सर यांचा एकमेकांशीं व आपल्याशीं जो संबंध आहे तो सुद्धां संसारच आहे. डोळ्यांनीं आपण या सृष्टींतील वस्तु पहातों. कानांनीं नाना प्रकारचे आवाज ऐकतों. जिभेनें रसाची गोडी चाखतों; हाहि संसाराचाच एक भाग आहे. मनाकडून नाना प्रकारचे व्यापार घडत असतात. त्यांना काय ठावठिकाणा आहे का ? तोहि संसारच. या शरिराकडून अनेक प्रकारचे उद्योग होत असतात. तोहि संसारच. असें या संसाराचें स्वरूप विविध तसेंच विराट आहे. यांत अनेक वस्तूंचें मिश्रण आहे. हें संसारबंधन कोणालाहि सुटलेलें नाहीं. होय एक गोष्ट खरी आहे. बायको, मुलेंबाळें हा या संसारांतीलच विविध पात्रें आहेत. त्यांना तूं संसार या नांवानें संबोधीत आहेस आणि त्या संसाराला तूं कंटाळून गेलेला दिसत आहेस. ही उपरति अलिकडेच तुझ्या मनाला झालेली दिसत आहे. बायको, मुलगा, कन्या, बंधु, भाचे, पुतणे हीं सारीं नात्याचीं माणसें. या संसारांत त्यांच्यापायीं कधीं कधीं त्रास होतो. आणि त्या त्रासाला कंटाळून अरण्यवास पत्करला म्हणून का संसार सुटतो आहे आपल्या मागचा ? नाहीं रे नाहीं !'

## या जंजाळाला कंटाळलों

बाबांचें हें बोलणें ऐकून चांदोरकर म्हणाले, 'होय, अशा याच संसाराचा मला कंटाळा आला आहे. काय सांगूं आपणाला ! मी अगदीं त्रासून गेलों आहे या सर्वांना ! आतांपर्यंत हा सारा जंजाळ संभाळला. आतां माझें मन अगदीं विटून गेलें आहें. ईश्वरानें आपल्या घरीं ज्यांना जन्माला घातलें त्यांचें देणें दिलें पाहिजे हें खरें; तें मी आजवर सर्व केलें; आतां मात्र आयुष्याच्या अखेरीस मी या व्यापाला कंटाळलों आहें. माझी या व्यापांतून आतां सुटका करा एवढीच आपल्या चरणीं प्रार्थना आहे.'

बाबा पुनश्च हांसले, आणि म्हणाले, 'अरे ! संसार कोणी बरें निर्माण केला ? त्यांचा निर्मिता तूंच की नाहीं ? मग आतां त्याचा कंटाळा करून कसें बरें चालेल ? तूं पूर्वसंचित बरोबर घेऊन आला आहेस. पूर्वजन्मीं जीं कांहीं कर्मे हातून घडलीं असतील त्याप्रमाणें त्यांची फळें मिळणार. तें जें संचित गांठीला बांधून तूं आणलें आहेस, तें भोगल्याशिवाय तुझी आणि कोणाचीहीं सुटका नाहीं. त्या गाठोड्यांत प्रत्येक जन्मीं

बरी वाईट भर पडत जाते. आणि पूर्व जन्मींच्या कर्मांचीं फळें भोगण्यासाठीं माणसाला पुन्हां पुन्हां जन्म घ्यावा लागतो. कोणी गरीब कुळांत तर कोणी मध्यम वा श्रीमंत कुळांत जन्म घेतो. कोणी संसारी बनतो, तर कोणी सन्यासी बनतो. कोणी ब्रह्मचारी तर कोणी उच्च किंवा नीच कुळांत जन्म घेतो. कोण घोड्याच्या, कोण बैलाच्या, कोल्ह्याच्या किंवा मोराच्या जन्माला येतो तर कोणाच्या वाट्याला वाघ, गेंडा, तरस, घार, कुत्रा, मांजर किंवा डुकराचा जन्म येतो. एवढेंच काय ? परंतु कोणी विंचू, सर्प, मुंगी अथवा पिसवीच्या रूपानें या जगांत येतात आणि वावरतात. त्यांच्या अस्तित्वाला कारण त्यांच्या ठायीं असलेला प्राणच होय. आणि तो प्राण सर्वांत जो आहे तो मात्र सारखाच आहे. असें असतां बाह्यस्वरूपांत मात्र फरक पडावा याचें कारण काय असावें याचा तूं कधीं विचार केला आहेस काय? या महत्वाच्या गोष्टीचा जर तूं विचार करशील तर कळून येईल कीं, हें लेणें पूर्वकर्मानुसार मिळालेलें आहे. त्यामुळे हे भिन्न प्रकारचे प्राणी सर्वत्र वावरत असलेले आपणांस दिसतात.

## ही पूर्वसुकृताची जोड आहे

हें वर्गीकरण झालें. ज्या वर्गांत ज्याचा जन्म होतो, तशीं त्याचीं लक्षणें असतात. तसतसे भोग, सुख किंवा दुःख त्याच्या वाट्याला येतात. ते पूर्वजन्मींच्या आपल्याच कृतीनीं आपण मिळविलेले असतात; मग दुसऱ्याच्या किंवा देवाच्या नांवानें उगाच खडे फोडण्यांत काय बरें फायदा ? प्रत्येकानें आपल्या वाट्यांला आलेले सुखदुःखभोग निमूटपणें भोगलेच पाहिजेत. त्यांना कंटाळून कसें बरें चालेल ? वाघ मांसावर आपली उपजीविका करतो, तर डुकर घाणींत डोकें खुपसून रहातो. आणि तरस पुरलेलें प्रेत उकरून त्यावर गुजराण करतो. तोच त्याचा देहस्वभाव. राजहंसाचें पहा ना. त्यांना कमळाचीं पानें आवडतात. आणि घारी, गिधाडें सडलेलें मांस चाखायला पहातात: जशी ज्याची योनि तशी त्याची कृति. या जगाची ही रीतच आहे. पूर्वसंचितानुरूप प्रत्येकाच्या वांट्याला जें जें कांहीं येईल तें तें त्यानें भोगलें पाहिजे. आणि हेंच पहा ना. कांहीं वाघ स्वच्छंदानें अरण्यांत खुशाल मोकळेपणें भटकत असतात तर कित्येकांच्या वांट्याला दरवेशाबरोबर तो नेईल तिकडे जाण्याचें आलेलें असतें. त्यांना बंधनांत वावरावें लागतें. स्वातंत्र्याचें सुख त्यांच्या वांट्याला येत नाहीं. त्यांना तुकड्यासाठीं तो दरवेशी दारोदार हिंडवीत असतो. आणि तो कसा त्याला चांगला बांधून सवरून ! कुत्र्यांचें नशीब कसें असतें पहा ! श्रीमंतांच्या घरीं राहून श्रीमंती व ऐषआराम भोगण्याचें भाग्य कांहीं कुत्र्यांच्या वांट्यास येत असतें. ते मऊ मऊ गाद्या गिरद्यांवरून खुशाल लोळत असतात, तर कित्येक कुत्रे भाकरीच्या तुकड्यासाठीं किंवा पोटाची भूक भागविण्यासाठीं रानोमाळ भटकत असतात ! कित्येक गाईंना चांगलें आंबोण, चारा व दाणागोटा खायला मिळतो, तर कित्येकांच्या वाट्यास साधें गवतही भरपूर येत नाहीं व त्यांना उकिरडा फुंकीत रहावें लागतें ! हे असें अधिक उणें, ही गरिबी श्रीमंती वाट्याला येते याचें कारण पूर्व प्रारब्धच होय. तें भोगल्याशिवाय या जगांत कोणाचीही सुटका

होणार नाहीं. बाबारे, माणसांनाही तोच नियम लागू आहे. एकाचा जन्म श्रीमंत घराण्यांत होतो, तर दुसरा दारिद्र्यानें पिडलेल्या घरांत जन्म घेतो. एकाचें भाग्य आगळे असतें तर दुसरा अनाथ होऊन दारोदार भिक्षा मागत हिंडत असतो. एक गाडी घोडे उडवीत आपल्या जिवाची चैन करीत असतो व टोलेजंग वाड्यांत वास्तव्य करून खुशाल ऐश–आराम भोगीत असतो तर दुसरा अंगावर घड वस्त्र नाहीं, ना घर ना दार, उघड्यावर पडण्याची त्याच्यावर पाळी आलेली असते. कित्येकांचें घर मुलांबाळांनीं भरून गेलेलें असतें, तर कित्येकांस मुलेंबाळें होऊन तीं निजधामास निघून गेलेलीं असतात; आणि कित्येकांच्या वांट्यास मुळींच मुलेंबाळें येत नाहींत ! कित्येक वांझटपणामुळें दुःखी तर कित्येकांस फार मुलें झाल्यामुळें ते विचारांत पडलेले असतात ! अशा प्रकारचा हा चढउतार व विभिन्नता सर्वत्र आढळून येत असते.'

## हा केवळ भ्रांतीचा पडदा

चांदोरकर बाबांचें बोलणें लक्षपूर्वक ऐकत होते. ते मध्येंच कांहीं शंका आल्यामुळें हात जोडून म्हणाले, 'आपण जें कांहीं सांगत आहांत तें मला पटत आहे; मला तें मान्य आहे; परंतु मनुष्याला सुख आणि दुःख हें कां बरें व्हावें ? सुख झालें म्हणजे मनुष्य आनंदानें बेहोष होऊन नाचूं लागतो आणि दुःख झालें असतां धाय मोकलून रडूं लागतो. जणूं काय त्याचें अंतःकरण फाटून त्याचे तुकडे तुकडे होतात. अशा रीतीनें या संसारांत सुखदुःखाच्या पाठाशिवणीचा खेळ अखंड चालू असतो. कोणत्या क्षणीं काय वाट्याला येईल हें कांहीं सांगतां येत नाहीं. तेव्हां तात्पर्य हेंच कीं हा संसार किंवा प्रपंच म्हणजे सुखदुःखाची एक प्रचंड खाण आहे. तिचा त्याग करून आपण मोकळे झालें म्हणजे झालें. मग आपणांस कशाचीच बाधा होणार नाहीं.'

आपल्या शिष्याची ही शंका ऐकून बाबा म्हणाले, 'अरे ! सुखदुःख हें तूं काय समजतोस ? हा भ्रांतीचा पडदा आपल्या डोळ्यांवर ओढण्यांत आलेला आहे. त्यामुळें अमुक झालें म्हणजे सुख व तमुक झालें म्हणजे दुःख. दुःख हें मानण्यावर आहे. प्रपंचांत जें सुख असें तुम्हीं मानतां तें सुख मुळींच नसतें. आपण त्यावर सुखाचा नसता आरोप करीत असतों. असें पहा कीं, पूर्व संचितानुसार किंवा पूर्व प्रारब्धानुसार एकाला पंचामृत खायला मिळतें तर दुसऱ्याला काय सुके कोरडे व शिळे तुकडे ! किंवा कळणा कोंडा ! ज्याला भाकरीचे सुके कोरडे, तुकडे किंवा कोंडा खायला मिळतो तो स्वतःला दुःखी व दुर्दैवी समजतो आणि ज्याला पंचामृतावर हात मारायला मिळतो तो केवढा मी सुखी व भाग्यवान याच ऐटींत असतो. एक मधूर पंचपक्वान्नें भक्षण करतो व दुसरा कोंडामांड्यांच्या भाकरीचे तुकडे चघळतो. ते दोन्ही प्रकार पोटांत जाऊन त्यानें जठराग्नी शांत होतो. तेव्हां जठराग्नी शांत करणें हेंच एक कार्य साधावयाचें असतें आणि तें कोणत्याही वस्तूनें होऊं शकतें अंगावर नाना प्रकारचीं रेशमी व भरजरी सुंदर वस्त्रें घेऊन कोणी कोणी आपला देह शोभवितात तर तोच कोणी कोणी फाटकीं

तुटकीं वस्त्रें घालून किंवा झाडाच्या साली पांघरून ही झाकतात. भरजरी गरम शालीचें काय किंवा फाटक्या तुटक्या चिंध्यांचें काय, कार्य एकच आणि तें म्हणजे शरीर झांकणें. या पलिकडे दुसरें कांहीं नाहीं. याच्याशीं आमच्या सुखदुःखाच्या कल्पना चिकटलेल्या आहेत आम्ही मानतों तें सुख आणि दुःख हें मानणेंच फार घातक आहे. हा केवळ अंधकार आहे अशा या सुखदुःखाचे तरंग आपल्या मनांत उत्पन्न होतात, आणि मग मन इकडे तिकडे हेलकावे खाऊं लागतें. ही सारी भ्रांत आहे. मनुष्य या भ्रांतींतून मोकळा होईल, तिच्या पलिकडे जाईल. निर्भ्रांत होईल तेव्हांच तो सुखी होईल. या मोहांतून आपण आपली सुटका करून घेतली पाहिजे.

आतां याठिकाणीं अशी शंका मनांत येईल कीं, तरंग उठतात ते उगाच कां ? कांहीं तरी मुळांत असल्याशिवाय लहरी उठावयाच्या नाहींत. पाण्याशिवाय तरंग किंवा लहरी संभवत नाहींत; तसेंच दिव्याशिवाय प्रकाश दृष्टीस पडणार नाहीं. तेव्हां तरंग उठायला मुळांत कांहीं तरी पाहिजे. तरंग कोणामुळें उत्पन्न होतात माहीत आहे? लोभ, मोह, मद मत्सरादि जे षड्रिपू आहेत तेच हें तरंग उत्पन्न करणारे आहेत. असत्याला सत्य भासविणारें असें या तरंगांचें मोहक स्वरूप आहे. एखाद्या श्रीमंताच्या हातांत सोन्याचें सलकडें पाहून दरिद्री माणूस मनांतल्या मनांत चडफडतो. हें जें तात्कालिक चडफडणें तैच तरंग उठवितें. तेथे मत्सराचा तरंग उठला. मला सोन्याचें कडें हवें आहे असें मनाला वाटूं लागलें. मनांत लोभ जागा होतो. अशाच साऱ्या गोष्टी आहेत. हे कुठवर वर्णन करून सांगूं ? यासाठीं बाबारे प्रथम त्या षड्रिपूंना जिंकिलें पाहिजे. त्यांना आटोक्यांत आणिलें पाहिजे. त्या षड्रिपू शक्तीचा नायनाट झाला म्हणजे त्यांचें बळ खची होतें. मग तरंग कशाला उठतील? या षड्रिपूंना आपण शक्य ते प्रयत्न करून गुलाम बनाविलें पाहिजे. त्यांना वर डोकें करूं देतां कामा नये. बस म्हणजे बस! ऊठ म्हणजे ऊठ. अशा रीतीनें त्यांना आपल्या ताब्यांत ठेविलें पाहिजे. हे आपले सहा गुलाम बनवून टाकिल्यावर त्यांच्यावर ज्ञानरूपी जमादाराची योजना हुकमत चालविण्यासाठीं केली पाहिजे. आणि त्याच्यावर सद्विचाररूपी सेनापती नेमला पाहिजे. या साऱ्या खोट्या उपाधि आहेत. त्यांचा अशारीतीनें बंदोबस्त केला म्हणजे त्यांच्यापासून त्रास भोगावा लागणार नाहीं. सुखदुःखाच्या या खोट्या कल्पना आहेत. त्यासाठीं आपण खरें सुख कशांत आहे हें समजून घेऊन त्याची खुणगांठ बांधिली पाहिजे. खरें सुख म्हणजे मुक्ति—मोक्ष आणि जन्म मरणाच्या फेऱ्यांत सांपडणें म्हणजे दुःख. याशिवाय क्षणोक्षणीं भ्रमांत पाडणारीं सुखदुःखें अनेक आहेतच. एकंदरींत हा संसार सुखदुःखांनीं भरलेला आहे. या संसारांत कसें वागावें हें समजून घेणें अत्यंत महत्वाचें आहे. तेंच तुला मी सांगूं इच्छितों. तें लक्षपूर्वक ऐकून घेऊन त्याप्रमाणें वागत जा म्हणजे या फेऱ्यांतून तूं मोकळा होशील.

( पुढील अंकीं )

# दोन संस्मरणीय सत्यकथा

******************************

**श्री. रविशंकर महाराज हे गुजराथमधील एक लोकप्रिय, सेवाभावी व साधुतुल्य कार्यकर्ते आहेत. जनतेवर त्यांचें वजनहि दांडगें आहे. नवीन गुजराथ राज्याची प्रतिष्ठापना त्यांच्या हस्तें झाली; यावरून त्यांच्या थोरवीची कल्पना होईल. 'समर्पण' नामक गुजराथी मासिकांत त्यांचे दोन अनुभव प्रसिद्ध झाले असून आमच्या वाचकांस ते स्फूर्तिदायक होऊन राहतील अशी अपेक्षा आहे.**

भालनकांठा राज्यांतील एका गांवीं मुनिश्री संत भालजी यानीं एक शिबीर उघडलें होतें. सर्वसाधारण लोकांना भक्तिभावानें भरलेल्या संतकथा ऐकायला मिळाव्या व श्रोत्यांचें लक्ष भक्तिमार्गाकडे वळावें हाच त्या शिबिराचा मुख्य हेतू होता. थोड्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्या शिबिरांत मीहि दाखल झालों. तेथें धर्मसंबंधीं व भक्तिभावासंबंधीं नाना प्रकारच्या कथा संत भालजी हे सांगत असत. त्या चांगल्या रंगतही असत. लोक मोठ्या आवडीनें त्या ऐकायला येत असत. त्या गांवांत माधव भगत या नांवाचा एक सत्प्रवृत्त साधासुधा परंतु नीति धर्मानें वागणारा गृहस्थ रहात असे. तो दर दिवशीं अगदीं नियमानें त्या कथा ऐकायला येत असे. तो बिचारा भावीक गृहस्थ होता.

### भोजनाचें आमंत्रण

तें शिबीर कांहीं ठरावीक दिवसांपुरतें होतें. हां हां म्हणतां दिवस संपत आले. माधव भगतच्या मनांत एक सहज कल्पना येऊन गेली. शेवटच्या दिवशीं येथें येणारीं सारीं माणसें आपल्या घरीं भोजनाला आलीं तरी काय बहार होईल, त्या भाविक जिवाला असें वाटलें. आपण त्यांना काय देणार? साधी भाजी भाकर; परंतु तीं गोड करून खाणारी ही मंडळी अशी एकत्र पुन्हां कधीं मिळणार? पण तीं आपल्यासारख्या गरिबा घरीं येतील का? शंका कशाला? विचारून पाहूं या.

त्यानें नम्रतापूर्वक हात जोडून सर्वांना प्रार्थनापूर्वक आपल्याकडे भोजनार्थ येण्याचें आमंत्रण दिलें. आणि तें त्यानींही तितक्याच प्रेमानें स्वीकारलें. मीही त्यांत होतोंच. भाजी, आमटी व भाकर असा जेवणाचा साधाच बेत होता. परन्तु त्यांत प्रेम ओतप्रोत भरलेलें होतें. प्रेमानें आग्रह करकरून त्यानें आम्हां सर्वांना पोटभर जऊं घातलें.

त्याच्या बायकोचें नांव होतें मणी. असेल ३०-३५ वर्षांची. अत्यंत प्रेमळ, सुशील, पवित्र तशीच कष्टाळू. घर कसें अगदी स्वच्छ होतें. स्वयंपाकही तसाच साधा व स्वच्छ.

जेवणखावण आटोपलें. मणी ज्या खोलींत बसली होती त्या खोलींत तिचा निरोप घेण्यासाठीं मी गेलों. तिच्याशीं बोलत बसलों. इतक्यांत कांहीं तरी दाखविण्यासाठीं म्हणून ती हळूहळू शेजारच्या मेजापाशीं गेली. ती वर उठली तेव्हां कुठें तिचे पाय दोरखंडासारखे बारीक असल्याचें मला आढळून आलें. माझ्यानें विचारल्याशिवाय रहावेना. ' काय हो, वहिनी ! तुम्हीं पायानीं अगदींच अधू अहांत आणि मग घरांतील एवढा पसारा व कामधंदा कोण संभाळतें ? '

## पतिराजाना विचारा

मणीबाई जवळच उभे असलेल्या पतीराजाकडे बोट दाखवून म्हणाली, ' घराच्या कामकाजांत कधीं त्रास दिला आहे का हें यानांच विचारा. दळणें, स्वयंपाक करणें, भाकऱ्या भाजणें, भांडीं, घासणें, दूध काढणें, घर साफ सूफ करणें वगैरे कामें कोण करतें हें तेच आपणास सांगतील. फक्त पाणी तेवढें यांना भरावें लागतें. तेथें मात्र माझा इलाज चालत नाहीं.

मणीबाईचें बोलणें संपतें न संपतें तोंच पतिराज म्हणाले, ' खरें आहे हें सारें. त्याचबरोबर मी तिला कधीं दुःख दिलें आहे का विचारा. माझ्याकडून होईल तेवढें देण्यासाठीं मी सदासर्वकाळ झटत असतों. तिला आनंद वाटावा म्हणून माझे नेहमीं प्रयत्न चाललेले असतात. तिच्याकडून बहुतेक सर्व यात्रा करविल्या आहेत. कधीं गाडीनें, कधीं मोटारीनें व जेथें दोन्हीं वाहानांचा इलाज चालत नाहीं अशा पालिटाणा-सारख्या डोंगरावरील तीर्थस्थानीं तिला पाठकुळीवरून नेऊन देवदर्शन घडविलें आहे.

पती आणि पत्नी यांचें हें संभाषण ऐकून मी आश्चर्यानें थक्क होऊन गेलों. मी सहज विचारलें काय व मला आढळून आलें काय, याचा मी विचार करूं लागलों. दोघांचेंही एकमेकांवरील प्रेम पाहून मला मनस्वी आनंद झाला. त्या आनंदभरांत मी माधवला विचारलें, " काय हो ! हिच्याशीं लग्न होण्यापूर्वी ही पायानें अधू-पंगू आहे, याची कांहीं कल्पना होती का तुम्हांला ? "

" होय; चांगली कल्पना होती ! '

" मग अशा पंगू बाईबरोबर तुम्हीं जाणून सवरून कां बरं लग्न केलें ? "

" त्याला कारण आहे. तिला पहातांच मला वाटलें कीं, अशा या बिचाऱ्या बाईची कोण बरें सेवा करील ? पंगुपणामुळें सारें आयुष्य तिला दुःखांत काढावें लागणार आहे ! तिच्या जीवनांत मला आनंद फुलवितां येणार नाहीं का ! आणि तिची सेवा हातून घडावी यासाठीं मी हिच्याशीं लग्न केलें ! "

## वैवाहिक जीवनाचें रहस्य

वैवाहिक जीवनाचें हेंच तर रहस्य आहे. लग्न म्हणजे काय ! लग्न म्हणजे समर्पित होणें. परस्परांशीं प्रेमरज्जूनें बांधलें जाणें. त्यांत जी एक मुख्य कल्पना अंतर्भूत झालेली असते ती म्हणजे स्वतः सुख मिळविण्यापेक्षां दुसऱ्यास सुख देणें व दुसऱ्याच्या सुखासाठीं झटणे हीच होय. याचा अर्थ एवढाच कीं, ज्याच्याशीं विवाह बंधनानें आपण जखडले जाणार त्याच्यापासून सुख मिळविण्याची अपेक्षा करण्यापेक्षां

मी त्याच्या सुखासाठीं सदैव झटणार, या भावनेनें विवाहबद्ध होण्यांतच जीवनसाफल्य व विवाहसाफल्य आहे. अशा भावनेनें होणारा विवाह सुखावह झालाच पाहिजे. जेथें उभयपक्षीं आत्मसमर्पणाची भावना जागृत असते तेथें दुःख मुळींच संभवत नाहीं. जेथें घेण्याची, स्वीकारण्याची स्वार्थी भावना नाहीं तर देण्याची निःस्वार्थ भावना आहे तेथें उणीव कसली भासणार व दुःखाला जागा कशी राहिल ? या सुखी जोडप्याच्या सुखी जीवनाचें हेंच रहस्य होतें. प्रत्येक जोडप्यानें यापासून धडा घेण्यासारखा आहे.

× × ×

सतत भटकत, फिरत रहावयाचें, हा माझा स्वभाव असल्यामुळें नाना प्रकारचीं माणसें मला पहायला मिळतात. असाच एका सद्‌गृहस्थाच्या घरीं नेहमीं तुलसीदास रामायणाचा पाठ चालत असे तेथें जावेंसें वाटलें. त्यांची सुमारें तेवीस वर्षे वयाची वनलीला नावाची मुलगी होती. तिच्या आईचें शिक्षण फारसें झालेलें नसलें तरी ती सुसंस्कृत होती. तिच्या जवळ मी ग्रामोद्योगासंबंधानें बोलत बसलों होतों इतक्यांत वनलीला तेथें आली. मी तिची विचारपूस केली. इतक्यांत तिची आई म्हणाली, " महाराज, माझी वनलीला अशी तशी नाहीं ! तीं आपल्या नवऱ्याच्या घरीं सर्वांचीं आवडती होऊन राहिली आहे. आम्हांला अभिमान वाटतो तिचा ! तिची हकिगत आपल्यासारख्यानें ऐकण्यासारखी आहे.

**मुलीचें यश.**

मी सहाजिकच ती हकिगत ऐकण्याची उत्कंठा दर्शविली तेव्हां ती सांगूं लागली " सगळें थोडक्यांत सांगतें. हिचा विवाह लहानपणींच वनमाळी नांवाच्या एका मुलाशीं ठरला. त्या मुलाच्या वडिलांस पगार चांगला मिळत असे व तें कुटुंब सुखी होतें. दैवगतीनें त्या मुलाचे आईबाप निवर्तले. नंतर काका त्याचें पालनपोषण, शिक्षण वगैरे पाहूं लागले. तो मुलगा मॅट्रीकच्या वर्गात गेला त्यावेळीं माझी मुलगीही मॅट्रीकच्या वर्गात शिकत होती. माझी मुलगी त्या परिक्षेंत पास झाली व तो मुलगा नापास झाला ! मुलीला आम्हीं कॉलेजांत दाखल केली. तेथें मुलगी एफ्. वाय. मध्यें उत्तीर्ण झाली. मुलगा पुन्हां मॅट्रीकच्या परिक्षेला बसला व दुसऱ्यावेळींही तो नापास झाला. नंतर मुलीचें कॉलेजशिक्षण आम्हीं बंद केलें. मुलगा तिसऱ्या वर्षीं परिक्षेला बसला व त्याही वर्षीं त्याच्या पदरांत अपयश पडलें !

मला वाटलें कीं, माझ्या हुषार मुलीला असला दर वर्षीं गचांडी खाणारा मुलगा नवरा शोभण्यासारखा नाहीं. आपण कांहीं तरी दुसरा विचार केला पाहिजे; परन्तु तो आपला माझा विचार होता. पतिराजापाशीं एक दिवशीं हा विचार मी मांडिला तेव्हां त्यानीं दुर्लक्ष केलें, मी विचारांत पडलें.

**आय. सी. एस्. पाहुणा.**

नंतर थोड्याच दिवसांनीं मुलीच्या वडिलांस उद्योगधंद्यानिमित्त विलायतेची वारी करावी लागली. परत येतांना एका विद्यार्थ्याशी त्यांचा दाट संबंध घडून आला. आय. सी. एस. ची परीक्षा देऊन ( इंग्रजांच्या राजवटींतील ही घटना आहे. ) तो स्वदेशी येत होता.

तो रहाणारा आमच्याच भागांतला. त्याला मित्रत्वाच्या नात्यानें त्यांनीं आमच्या घरीं एक दिवस स्वस्थपणें घालविण्यासाठीं आग्रहानें बोलाविलें. आमंत्रण स्वीकारून तो आला. चांगला सुस्वभावी व मोठ्या हुद्यावर जाणारा तो होता.

मला एकांतांत गाठून हे म्हणाले कीं, फार चांगला व आय. सी. एस. झालेला मुलगा आपल्या घरीं आला आहे. असला जावई कोणाला आवडणार नाहीं? पहा विचारून वनलीलेला! माझ्या मनांत भरला आहे.'

वेळ गमावण्यांत फायदा नव्हता. मी वनलीलेला जवळ बोलावून ही गोष्ट सांगितली. मला अधीक बोलूं न देतां ती म्हणाली, 'आई! काय बोलतेस तूं हें! असें कधीं झालंय! माझा विवाह यापूर्वींच होऊन चुकला आहे. जें एकदा ठरलें तें ठरलें. एकदां मुखावाटे वाणी बाहेर पडली ती पडली!'

'त्यांत कसली आली आहे हरकत? ठरलेलीं लग्नें कांहीं ना कांहीं कारणामुळें मोडत नाहींत का?'

## जो वरिला तो वरिलाची

'नाहीं; आपण वचनबद्ध झालेले आहोंत. तें वचन मोडणें मला मुळींच आवडणार नाहीं. त्या मुलाचे आई बाप हयात असते तर त्यांना काय बरें वाटलें असतें? हें पहा; तुम्हीं माझी चिंता करूं नका. माझ्या वाट्याला दुःख कष्ट भोगण्याचें आलें तर ते मीं आनंदानें सोशीन; परंतु दिलेला शब्द मोडल्याचें दुःख माझ्यानें सहन करवणार नाहीं! माझ्या नशीबांत असेल तसें होईल!'

मुलीचें हें उत्तर ऐकून मी निरुत्तर झालें. इतकें तिनें सांगितल्यानंतर मी तरी काय बोलणार? आमच्या घरीं आलेल्या आय. सी. एस्. पाहुण्याला यासंबंधीं कांहींच कल्पना देण्यांत आली नव्हती. आगतस्वागत व पाहुणचार स्वीकारून तो आला तसा गेला.

त्यानंतर आमच्या या मुलीचें लग्न त्या लागोपाठ तीन वेळां नापास झालेल्या मुलाशीं झालें. सर्व यथासांग झालें. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे लग्न झालें. त्यानंतर तो मुलगा पुन्हां मॅट्रीकच्या परिक्षेला बसला व त्यांत उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाला. नंतर कॉलेजच्या परिक्षेंत प्रती वर्षी उत्तीर्ण होत होत तो पदवीधर झाला. नंतर त्याला नोकरीसाठीं फार दिवस थांबावें लागलें नाहीं. एका मोठ्या सिमेंट कंपनीत त्याला चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. कारखाना शहरापासून ४।५ मैलांवर असलेल्या जंगलांत होता. नोकर वर्गासाठीं लहान मोठीं घरें व चाळी बांधण्यांत आल्या होत्या. माझी वनलीला आपल्या पतीबरोबर तिकडे रहायला गेली. ती स्वयंपाकांत त्याचप्रमाणें शिवण कामांत व इतर कलाकौशल्यांत तरबेज असल्यामुळें आपलें घरकाम सांभाळून आजुबाजूच्या स्त्रियांत व मुलांत ती कार्य करूं लागली. सेवा करूं इच्छिणाऱ्यास वाटेल तेवढें काम पडलेलें आहे. वनलीलेला सर्वांच्या उपयोगी पडण्याची, फावला वेळ जनसेवेंत घालविण्याची भारी हौस. तेथें तिला जरूर असलेलें कार्यक्षेत्र मिळालें व आजकाल तेथें ती सर्वांची आवडती होऊन राहिली आहे. सेवाभावानें तिनें सर्वांचीं अंतःकरणें जिंकलीं आहेत, हें ऐकून आम्हांला मोठें समाधान वाटतें

— समर्पण वरून साभार

———

# अमरत्त्व मिळविण्याचा तुकोबानीं दाखविलेला मार्ग

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥
ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोसवोसले देहभाव ॥
आला होता गेला पूर । धरिला धीर जीवनीं ॥
तुका म्हणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ॥

या अभंगांत तुकाराम बुवांनीं गीतेंतील तत्वज्ञानाचाच अनुवाद केलेला आहे. मरण कसें मरून जावयाचें व मनुष्याला अमरत्व कशानें येतें हें पहाण्यासारखें आहे. मरण हें काय सर्वांच्याच वाट्याला येतें. सारीं माणसें मरून जातात. तो मरणाचा अर्थ येथें लागू पडत नाहीं. देहांत असतां मरण मरून गेलें पाहिजे. देहधारी असतां मरण कसें मरून जावयाचें ? तसें होतां येतें. मरण मरून जाणें म्हणजे काय आणि तें कसें होऊं शकतें यांचा उलगडा वरील अभंगाच्या तिसऱ्या चरणांत करण्यांत आला आहे. जन्ममरणाचा पूर आला आणि गेला. नदीला पूर येऊन बेसुमार पाणी वाढतें. त्यांत एखादा मनुष्य सांपडला असतां तो जर बळकट आधाराला धरून राहिला नाहीं तर तो वाहून जाऊन त्याचा नाश होतो. त्याचप्रमाणें ज्याच्यामुळें आपणास जिवंतपणा आला, जीवन प्राप्त झालें व ज्याच्यायोगें साऱ्या सृष्टीला जीवन प्राप्त झालें आहे त्या परमात्म्याला आपण श्रद्धापूर्वक बिलगून राहिलों म्हणजे जन्ममरणाच्या पुरांतून आपण निश्चितपणें तरुन पलिकडे जाऊं. तसें नाहीं केलें तर मात्र त्या पुरांत सांपडून आपण वाहून जाऊं. देहधारी असतां परमेश्वराला सदैव चिकटून रहाणें व जेणेंकरून आपलें, आत्म्याचें कल्याण होईल अशा रीतीनें वागणें ( आणि कल्याणाचा मार्ग कोणता हे आपण जाणतों ) हाच स्वर्गाचा मार्ग आहे. आणि ज्या संसारांत आपण पडलों आहोंत त्यांतच निमग्न होऊन बेफामपणें बेजबाबदारपणें वागणें हा नर्कवास होय. जगणें आणि मरणें तें हेंच होय. स्वर्ग काय किंवा नरक काय, त्याचा उपभोग घेण्यासाठीं कुठें दुसरीकडे जायला नको. त्याचा उपभोग याच जन्मीं घेतां येतो.

## देहभाव गमावून बसणें

याच अभंगांत—'ठाव पुसिलें बुड पुसिलें ! वोस वोसिलें देहभावा' असें म्हटलें आहे. देहभाव ओस झाला म्हणजे काय झालें याचा आपण थोडासा विचार केला पाहिजे. दुष्काळ पडला—भीषण दुष्काळ पडला म्हणजे काय होतें ? त्या परिस्थितींत कधीं कधीं गांवचें गांव ओस पडतात. सारे व्यवहार बंद होतात. कुठें कुठें

गावांत वस्ती होती कीं नाहीं याची भ्रांत पडावी इतका ओसाडपणा येत असतो. हळुहळु त्या गांवांतील घरेंदारेंही जमीनदोस्त होतात. आणि सपाट झालेली जमीन तेवढी दिसून येते ! देहभाव ओस व्हावयाचा तो असाच. हेंच मरण मरणे होय. आपण देहांत असतां अशारीतीनें देहभाव सर्वस्वी नष्ट होणें. ही कठीण गोष्ट आहे. परंतु देहभाव साहींसा होण्याचे क्षण मनुष्याच्या जीवनांत कधीं कधीं येतातत. गायकाच्या किंवा गायन प्रिय लोकांच्या वाट्यास देहभाव विसरण्याचे क्षण कधीं कधीं येतात. एखादी रागाची तान छेडतां छेडतां ती. छेडणारा व त्या तानेनें तल्लीन झालेला अशा दोघांनाही देहाचा विसर पडतो. मनुष्य अशावेळीं देहभान हरपून बसतो.

एखादा निकटवर्ती नातलग फार आजारी असतो. त्याच्या शुश्रुषेत त्याची नातलग माणसें गुंतलेलीं असतात. त्या दुखणाईताचें दुःख दूर व्हावें यासाठीं त्यांची धडपड चाललेली असते, नाना उपाय केले जातात. सदासर्वकाळ तीच चिंता त्यांना लागून राहिलेली असते. दिवस उगवला केव्हां व रात्र आली केव्हां, याचेंही त्यांना भान रहात नाहीं. हें प्रेमाचें लेणें देणें आहे. प्रेमाच्या गावाला गेल्याशिवाय याचा अनुभव येणार नाहीं. म्हणूनच 'जावें प्रेमाचिया गांवा.' भजनी लोकांचा अनुभव तुम्हांला माहीत आहे ? 'ब्रह्मानंदीं लागली टाळी ! कोण देहातें संभाळी' अशा रंगाप्रत भजन कधीं कधीं येत असतें आणि मग भाविक माणसें त्याप्रसंगी देहभान विसरून नाचूं बागडूं लागतात. ते देहधारी असले तरी ते त्यावेळीं देहातीत, देहाच्या पलिकडे गेलेले असतात, परंतु हा निवृत्ति प्रवृत्तीचा अनुभव केवळ थोड्या वेळापुरताच असतो. तो स्थिर करणें कठीण आहे हेंही खरें आहे; आणि म्हणूनच त्याची महति फार आहे. ही भावना आपलें कल्याण करणारी आहे, हें का वेगळें सांगायला हवें ? हा भाव स्थीर करण्यासाठीं आपण तयार झटलें पाहिजे. तेव्हां देहधारी असतांहि आपलें म्हणजे देहाचें मरण पाहून आपण अमर झालों, म्हणजे 'ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभावा ॥' अशी स्थिति होते. आपणाला जीवन व साऱ्या सृष्टीला जीवन ज्यामुळें आलें तोच परमात्मा आपला सखा, आपलें शाश्वत कल्याण करणारा आहे; अशा श्रद्धेनें त्यालाच बिलगून रहावयाचें त्याला शरण जावयाचें, अशी स्थिति ज्याच्या वांट्याला येते, त्याला मरणाची फिकीर वाटत नाहीं; सुखदुःखाच्या पलिकडे तो पोहोंचलेला असतो. शरिराला दुखणेंबाणें येणें, तें रोगग्रस्त होणें, हें अगदीं सहाजिकच आहे. परंतु अशा मनुष्याला त्या दुखण्याबाण्याचें कांहीं वाटत नाहीं. भोगत्रय वांट्याला आले तें निमूटपणें भोगायचें. तें भोगत असतां त्याच्या मनाला क्लेश होत नाहींत. कारण त्याला आधार सांपडलेला असतो. तो निराधार नसतो. त्याची समता, त्याचें समाधान किंवा वाटल्यास समाधि म्हणा, मुळींच भंग पावत नाहीं.

## अशीं माणसें आजही आहेत

तेव्हां अशा रीतीनें देहधारी असून शरिराला क्लेश, वेदना होत असूनही तो

त्याबद्दल उदासीन असतो. अशा रीतीनें शरिराविषयीं उदासीन होणे म्हणजेच मरण मरून जाणें. ही गोष्ट अतर्क्य किंवा अशक्य मुळींच नाहीं. अशा रीतीनें मरण मरून गेलेलीं माणसें, ' देव माणसें ' आपल्यांत होऊन गेलीं आहेत व आजही त्यांचा आढळ कुठें कुठें होत असतो.

आत्मा अमर आहे. आपण मोहजालांत सांपडून आपल्या सभोंवार एक विविध भावनांचें जाळें निर्माण केलें आहे. मनुष्य कामक्रोधादिकांच्या स्वाधीन झाला म्हणजे याच जगांत त्याचा नरकवास सुरू होतो. तोच त्या भावनांपासून आपली सुटका करून घेऊन, दुष्ट वृत्तींपासून दूर राहून शांतीच्या समाधानाच्या मार्गाला लागला म्हणजे आपण आपल्या सभोंवार स्वर्गलोक निर्माण करतों. स्वर्ग आणि नरक आपल्या आचरणांत व नेहमींच्या कृतींत आहे.

आपण मनाशीं एक गांठ घट्ट बांधून ठेविली पाहिजे. या सर्व जगाचा आधार म्हणजे परमेश्वर. त्याच्या ठायीं आपण आपलें चित्त परोपरीनें शक्य त्या मार्गानें स्थिर करावयाचें. तसें केलें म्हणजे आपल्यावर कितीही पूर येवोत. आपण त्यांत बुडून, वाहून जाणार नाहीं. देहांत असतां मरण मरून जाणें, व अमर होणें तें हेंच होय. ज्या भाग्यवंतांस तें लाभलें तें धन्य होत.

श्रीकृष्ण परमात्म्यानें गीतेच्या द्वारें आपणास शाश्वत कल्याणाचा हाच मार्ग सांगितला आहे.

---

सद्वर्तनानें जो आपल्या पित्याला आनंद देतो, तोच खरा पुत्र होय. आपल्या पतीच्या सुखासमाधानासाठीं व कल्याणासाठीं झटणारी तीच खरी पत्नी होय; त्याच प्रमाणें सुखाच्या प्रसंगीं व आपत्तीच्या काळांतही जो सोडून जात नाहीं, तर वेळप्रसंगीं सहकार देण्यास तयार असतो तोच खरा मित्र होय. आणि पूर्वसुकृताचें पुण्य गांठीस असल्याशिवाय आयुष्यांत अशा या त्रयीची गांठ पडत नाहीं.

—भर्तृहरी

आत्मविश्वास किंवा आत्मश्रद्धा ही ईश्वराकडून मिळालेली एक महान देणगी आहे. ज्याच्याठायीं आत्मविश्वास भरपूर आहे त्यानें आपल्या भवितव्याची चिंता कर-ण्याचें मुळींच कारण नाहीं. कितीहि अडचणींचे पर्वत समोर येऊन उभे राहिले तरी आत्मविश्वासाच्या बळावर ते हां हां म्हणतां वितळून जातात. जगांत तुम्हांला अशीं कांहीं माणसें आढळून येतील कीं ज्यांच्यापाशीं कसलेहि भांडवल नव्हतें. जें कांहीं होतें तें म्हणजे फक्त आत्मविश्वास; परंतु त्याच्याच बळावर त्यांनी वैभवाचें शिखर गांठलें आहे.

— ओ. एस्. मार्डेन

---

# शिरडीच्या साईबाबांचा दरबार

—श्रीमती मणी साहुकार

**श्रीमती मणी साहुकार ह्या श्रीसाईबाबांच्या एक निष्ठावान् भक्त असून त्यांनीं 'भारती' नामक हिंदी मासिकांत बाबासंबंधीं एक सुंदर लेख लिहिला असून त्यांतील कांहीं भागाचा अनुवाद येथें आमच्या वाचकांसाठीं देण्यांत येत आहे.**

**श्री.** साईबाबा हे स्वतः फकिरी बाण्यानें व वैराग्यशील वृत्तीनें वागत असत; परंतु तशा प्रकारची अपेक्षा ते इतरांकडून मात्र करीत नसत. त्यांचा आहार, रहाणें-सवरणें अत्यंत साधें असे. परंतु म्हणून इतरांनींहि त्या वृत्तीचा अवलंब करावा असें त्यांना वाटत नसे. सर्वांकडून कठोर व तापसी वर्तन घडणें कठीण आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती; यामुळें तसा उपदेश ते कोणालाहि करीत नसत. देहाचें दंडन करावें, असें त्यांनीं कधीं सांगितलें नाहीं. लोकांच्या जेवणाखाण्यावर व रहाणीवर बंधनें कां म्हणून घालावयाचीं ? दंडन झालें पाहिजे मनाचें. अंतःप्रवृत्तीचें, बाह्योपचारांस कसलें महत्व द्यावयाचें ? आणि तें कां म्हणून ? मनुष्याचें मन, हृदय हीं शुद्ध असली पाहिजेत. त्यांच्या शुद्धतेसाठीं प्रत्येकानें जपावें असे ते सांगत असत. बाहेरचें वैराग्य किंवा शरीर-दंडन याला महत्त्व नाहीं.

या देहाच्या ज्या स्वाभाविक गरजा आहेत त्या भागविल्याच पाहिजेत. इच्छा आटोक्यांत असाव्या; परंतु त्यांचा त्याग सर्वथा करूं नये.' कोणी भक्त उपवास करीत असत. केवळ उपवास काय कामाचा ? शरिराला त्रास देण्यापलिकडे त्याचा फारसा उपयोग नाहीं. उपवास करण्यापेक्षां जरूर करण्यासारख्या अशा इतर अनेक गोष्टी आहेत. त्यांच्याकडे कोण लक्ष पुरवीत आहे ? बाबा उपवासास उत्तेजन देत नसत. कामवासना आटोक्यांत ठेवण्यासाठीं झटा. त्या अग्नीत जळून भस्म होऊन जाऊं नका असें ते सांगत असत.

माणसानें व्यवस्थित व चांगलें खाणें खावें. बाबांनीं कोणाच्या जेवणा-खाण्यावर कधीं निर्बंध घातला नाहीं. बाबा स्वतः एका हंडींत भोजन शिजवीत असत. त्यांत डाळ, तांदूळ, तूप, भाजीपाला व इतर मालमसाला घालून ती हंडी चांगली शिजवीत असत. त्या हंडींतील मधुर प्रसाद ते सर्वांना वाटीत असत व प्रेमानें खाववीत असत. कितीहि पाहुणे भोजनास येवोत. त्या द्रौपदीच्या थालींतील तो गोड प्रसाद कधीं संपत नसे. तो सर्वांना पुरून उरत असे !

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे श्रीसाईबाबांच्या निवासस्थानांतील एकंदर वातावरण तामसी व कठोर नव्हतें तर तें सुखदायक व आनंदकारी होतें.

श्रीसाईबाबा दर्शन सुलभ होते. त्यांचें दर्शन कोणालाहि सहजरीतीनें घेतां येत असे. आडकाठी कोणालाहि नसे. ते जास्त वेळ मशिदीबाहेर किंवा मशिदीच्या आसपास कुठें तरी असत. मधून मधून सर्वसाधारण लोकांना समजतील असे दृष्टांत देऊन ते सभोवारच्या लोकांना बोधामृत पाजीत असत. अनेक रोगी व संकटग्रस्त लोक त्यांच्या दर्शनास येत असत. प्रत्येकाचें हृद्गत समजून घेऊन परदुःख निवारण करण्यासाठीं ते झटत असत. माणसानें सुखासमाधानांत रहावें; दुःखी कष्टी राहूं नये असें सांगून त्यासाठीं आपल्याकडून शक्य असेल तें ते करीत असत.

परंतु त्यांना पराकाष्ठेचें दुःख होत असे तें एका गोष्टीचें. संसाराचीं दुःखें घेऊन हे सारे लोक माझ्याकडे येतात; रडतात; परंतु त्या आत्मारामाकडे कोणी वळत नाहीं. आत्मारामाचें वैभव किती आहे, त्याची ओळख पटवून घेऊन शाश्वत सुखाचा धनी कोणत्या मार्गानें व्हावें हें विचारायला मात्र माझ्याकडे कोणी येत नाहीं. तें वैभवशाली जीवन मी देऊं शकतों परंतु त्याची ओढ कोणालाहि लागलेली दिसत नाहीं. सारीं माणसें संसाराच्या जाळ्यांत पूर्णपणें अडकून गेलीं आहेत.'

आजच्या काळांत ज्याला शिक्षण म्हणतात तें त्यांच्या वाट्याला आलें नव्हतें. त्यांनीं शाळा, कॉलेजांत प्रवेश करून पदव्या संपादन केल्या नव्हत्या. परंतु शास्त्रें, पुराणें, गीता, उपनिषदें, कुराण वगैरे साऱ्या धर्मग्रंथासंबंधीं त्यांचें ज्ञान आश्चर्य करण्यासारखें होतें. श्रीसाई दरबारांत कधीं कधीं मोठ-मोठे शास्त्रीपंडीत व विद्वान येत असत. ते त्यांचें ज्ञान पाहून आश्चर्यानें थक्क होत असत. कोणता श्लोक कोणत्या ग्रंथांत व कोणत्या अध्यायांत आला आहे हें ते अचूक सांगत असत. एखादा. कितीहि गहन असा अध्यात्मासंबंधीं प्रश्न असला तरी त्याची उकल ते सहज रीतीनें व कोणालाहि समजेल अशा-रीतीनें करीत असत.

साईबाबा कुठेंहि बसलेले असोत; त्यांच्यासमोर हां हां म्हणतां मेळावा जमा होत असे. मग नाना वार्तालापांनीं तेथील वातावरण भारावून जात असे. वातावरण कसें पवित्र व आनंदानें सदासर्वकाळ भरलेले असे. तेथें सुस्ती, आळस किंवा कंटाळा यांना सहसा थारा नसे. मधून मधून विनोदाचे फवारेहि उडायचे. बाबांजवळ जायला कोणालाहि भीति वाटत नसे.

कधीं कधीं बाबा क्रोधायमान होऊन अक्राळ विक्राळ स्वरुपहि धारण करीत असत. मग मात्र त्यांच्याजवळ जाण्याची कोणाचीहि तयारी नसे. त्यांच्या क्रोधाचें कांहीं ना कांहीं कारण असे. तें नंतर उघडकीला येत असे. तें कोडें असे; परंतु तें तात्काळ उकलत असे. क्रोधाचा समय क्षणिक असे. नंतर त्याचा कांहींएक मागमूस रहात नसे. पुनरपि बाबा खेळीमेळीनें व प्रेमभाषानें सर्वांशीं वागत असत. बाबांचा क्रोधावेश म्हणजे एका निष्काम स्थितप्रज्ञाचा व योगेश्वराचा क्रोध. ती शंकराची रुद्रलीला. तिच्या पोटीं भक्तांच्या कल्याणाची भावना दडलेली असावयाची.

# बहुजन सुखाय—बहुजन हिताय

—स्वामी विवेकानंद

**हिंदुधर्माचा अद्वैत सिद्धांत ह्याच अढळ व विज्ञान शास्त्राच्या कसोटीला उतरणारा आहे. त्यांत बहुजनांचें कल्याण व सुख सामावलेलें आहे. व म्हणून तोच अक्षय टिकणारा आहे.**

जगांतील निरनिराळ्या देशांत विज्ञान व धर्म यांच्यामध्यें कलह चालू आहे. त्याचें कारण काय बरें असावें ? जगांत जे वेगवेगळे धर्म आहेत त्यापैकीं बहुतेक धर्मांतून असें सांगण्यांत आलें आहे कीं, या जगांत जे विविध व्यापार चालू आहेत ते चालविणारी शक्ति या जगापासून अगदीं वेगळी आहे. तसेंच ती जगाबाहेर आहे. सूर्याला चलनवलन व प्रखर प्रकाश देणारी एक शक्ति आहे. तशीच चंद्राला गति देणाराहि वेगळाच आहे. मनुष्यमात्राला नाना-

---

साईबाबांच्या काळांतील शिरडीचें वैभव काय सांगावें व काय वर्णावें ! श्रीसाई-बाबांच्या रुपानें स्वयं श्रीसच्चिदानंद प्रभूच तेथें वास्तव्य करीत होते. मग तेथें सुखसोह-ळ्याला व आनंदाला कसला आला आहे तोटा ! धन्य तें स्थान व धन्य ते तत्कालीन भाग्यवंत भक्त ! त्यांनीं बाबांच्या लीला प्रत्यक्ष पाहिल्या व अनुभाविल्या !

—आणि आज ? आजहि हजारों भक्तजन भक्तिभावानें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें शिरडींत येतात, बाबांच्या समाधि स्थानाचें, श्रीसाई मंदिराचें व इतर पुण्यस्थानाचें दर्शन घेऊन पुण्यपावन होऊन जातात. आजहि साईबाबा आपल्या भक्तांच्या हांकेला पूर्वीप्रमाणें ओ देतात. त्यांना संकटमुक्त करतात व त्यांच्या मनोकामना पूर्ण करतात.

आणि समाधि घेतेवेळीं बाबांनीं आपल्या सर्व काळांतील सर्व भक्तांना आश्वासन देऊन ठेविलें आहे कीं —

**शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥**
**माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हें हरेल सर्व त्याचें ॥**
**जरी हें शरीर गेलों मी टाकून । तरी मी धांवेन भक्तांसाठीं ॥**
**नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धि माझ्या ठायीं ॥**
**नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवें ॥**
**शरण मज आला, आणि वायां गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥**
**जो जो मज भजे जैशा जैशा भावें । तैसा तैसा पावें मीही त्यासी ॥**
**तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हें अन्यथा वचन माझें ॥**

आणि या गोष्टीची प्रचीति आजवर असंख्य लोकांस आलेली आहे व पुढेंहि येत राहील ! जो भक्त अंतःकरणापासून साईबाबांना हांक मारतो, त्याच्या हांकेला ते ओ दिल्याशिवाय रहात नाहींत. मात्र तुमच्या हांकेत सत्यनिष्ठा व आर्तता पाहिजे.

प्रकारचे रोग होतात; त्यांचें नियंत्रण करणारी एक वेगळीच शक्ति आहे. अशा रीतीन अनंत देवांची कल्पना लोकांत रूढ झाली आहे. कित्येक घटना तर भुताखेतांमुळें घडून येतात असें मानणारेहि लोक आहेतच.

दरेक वस्तूंचें आदिकारण शोधायचें तर तें कुठें तरी बाहेर आहे तें शोधून काढण्याकडे मानवी प्रवृत्ति आहे; परंतु विज्ञानानें असा शोध लाविला आहे कीं, दरेक वस्तूंचें कारण शोधायला बाहेर जायला नको. त्याचें कारण त्या वस्तूंतच शोधलें पाहिजे. विज्ञानाची उत्तरोत्तर प्रगति होत चालली आहे तसतशी एक गोष्ट निश्चित होत चालली आहे कीं, जगांत ज्या कांहीं घटना वेळोंवेळीं घडून येतात त्याला कारण भूतपिशाश्च किंवा नाना देवता नसून त्या घडण्याचें कारण सृष्टीचें कांहीं नियम ठरलेले आहेत. त्या घटनांचें कारण कुठें बाहेर नाहीं.

अद्वैतवादाच्या सिद्धांतानें सर्व संशयाचें निरसन केलें आहे. आणि आमच्या धर्मांचा पाया अद्वैतवाद हाच आहे. आणि तोच धर्म विज्ञानाच्या कसोटीस उतरणारा आहे. कितीहि आक्रमणें झालीं तरी आमचा धर्म टिकून राहिला आहे, याचें मूलभूत कारणच हें आहे. कारण तो तसाच शक्तिसंपन्न आहे. या जगाची, या ब्रह्मांडाची रचना व उभारणी ज्यानें केली तो रचनाकार निर्माता या ब्रह्मांडाच्या बाहेर नाहीं, तो तुमच्या ठायीं तुमच्या अंतरांत वास करीत आहे.

‘ तत्वमसि श्वेतकेतो ! ’ हे श्वेतकेतू ! तें तत्त्व तूंच आहेस. त्याचा वास तुझ्याच ठायी आहे.

तेव्हां आमचा हिंदुधर्म किती श्रेष्ठ आहे व विज्ञानाच्या कसोटीला उतरणारा कसा आहे हें आपण पहा ! दिवसें दिवस विज्ञानाची प्रगति होत चालली आहे. विज्ञानाकडे जनतेचें लक्ष अधिकाधिक वेधूं लागलें आहे. विज्ञान ! विज्ञान !! असा पुकार आज चोहोंकडें चालला आहे. आधाराशिवाय आज कोणत्याहि गोष्टीचा स्वीकार करायला आपण तयार नाहीं. त्यामुळें आस्ते आस्ते सारे सांप्रदाय अद्वैताकडे वळत आहेत. त्यांना अद्वैतवादी बनल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण शास्त्रीय कसोटीला सर्व परीनें उतरणारा असा हा या धर्मांचा सिद्धांत आहे.

भगवान बुद्धानें जगाला काय सांगितलें ? ‘ बहुजन हिताय बहुजन सुखाय. ’ अनेक माणसांच्या कल्याणासाठीं व अनेक माणसांच्या सुखासाठीं—या मताचा प्रचार करण्यासाठीं तुम्हीं बाहेर पडा. इतरेजनांबद्दल मनांत दयाभाव बाळगा, परमतसाहिष्णुता अंगीं बाणवा, अज्ञान घालविण्यासाठीं शक्य त्या पेरीनें झटा, सर्वांना ज्ञानवान् बनवा, प्रत्येकाला पुढें जाण्याची सुसंधि द्या, कोणाचेही पाय मागें खेचण्याचें पापकर्म करूं नका.

या भारतांत क्रमाक्रमानें, आस्ते आस्ते अशा या धर्माचा प्रचार चालू आहे. असत्याकडून सत्याकडे व काळोखांतून प्रकाशाकडे आपण जात आहोत. हा अखंड प्रवास आहे. व त्यांत एकमेकांनीं हातांत हात घालून सहकारानें वाटचाल करावयाची आहे.

———

# श्री दत्तावतार श्री सद्गुरु साईमहाराज

ले. अनंतराव मराठे

गावीं संत चरित्रें हो ।
तारक परम पवित्रें हो ॥ १ ॥
संतापोटीं देव वसे । देवापोटीं संत असे ॥ १ ॥
ऐसा परस्परें मेळा । देव संतांचा अंकिला ॥ २ ॥
संतांठायीं देव तिष्ठे । देव तेथें संत बसे ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं संत । देव तयांचा अंकित ॥ ४ ॥

—एकनाथ

श्रीकृष्णपरमात्म्यानें भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें जगांत अधर्म प्रबल होऊं लागला म्हणजे जगाची गाडी पुनः धर्मावर आणून सोडण्यासाठींच भगवंताचे अवतार होत असतात.

या अवतारांत साधूंचें संरक्षण व दुष्टांचा नाश हें एक कार्य असतेंच. श्रीरामकृष्णादि अवतारांत भगवंतांनीं हें द्विविध कार्य केल्याचे प्रसिद्ध आहेच. श्रीदत्तावतार हा मुख्यतः मानवांतील अज्ञानाचा नायनाट करून त्याला ज्ञानदान करण्यासाठीं व भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठीं होता व आहे.

आहे म्हणण्याचें कारण परमात्म्याच्या इतर अवतारांप्रमाणें विशिष्ट कार्य होताच ते लुप्त झाले. त्या अवतारांपैकीं हा अवतार नसून **मानवाची भक्तिमार्गाकडे प्रवृत्ति असावी म्हणून निरनिराळ्या वेळीं नि निरनिराळ्या ठिकाणीं संतांच्या स्वरूपांत हा आपलें अस्तित्व दाखवित असतो.**

या दत्तावतारांत पूर्वकालचे श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह सरस्वती आणि आधुनिक काळांतील श्री. माणिकप्रभू, श्री. अक्कलकोट महाराज हे मुख्यावतार मानतात व त्यानंतरच्या काळांतील श्री. वासुदेवानंद सरस्वती, ब्रह्मानंद सरस्वती, श्री. देव मामलेदार इत्यादींच्या मालिकेंत शिर्डीचे श्रीसाई महाराज यांना महत्त्वाचें स्थान आहे. शिवाय श्रीदत्तअवतारासंबंधानेंच असें एक मत प्रचलित आहे कीं, 'आर्यधर्म आणि अनार्यधर्म, हिंदुधर्म आणि बौद्धधर्म, हिंदुधर्म आणि इस्लामीधर्म, हिंदुधर्म आणि खिस्तीधर्म या भिन्न संस्कृतींच्या संधिकालीं म्हणजेच युगायुगाचे ठिकाणीं श्रीदत्तांचे प्रतिनिधी असे भक्तहि निर्माण झाले आहेत.'

श्रीसाई महाराजांच्या चरित्राकडे पाहिलें म्हणजे ही गोष्ट अधिकच प्रत्ययाला येते. कारण संतांच्या 'जाती' कडे जरी पहावयाचें नसलें तरी लौकिकदृष्ट्या

त्यांच्या जातीची जे चौकशी करतात त्यांना तिचा पत्ताच लागलेला नसून एका अर्थानें ते ‘ अजातीय ’ किंवा ‘ सर्वजातीय ’ समजले जातात. त्यामुळें त्यांच्या भक्तमंडळींत काशीपासून रामेश्वरापर्यंतच्या हिंदुमात्राचाच नव्हे तर मुसलमान, पारशी नि खिश्चन यांचाही समावेश होतो. किंबहुना हलीच्या जाति-धर्म निरपेक्षतेच्या युगांत श्रीसाईमहाराजांचें गुरुपीठ हें एक सर्वसाधारण समान असें व्यासपीठ बनलेलें आहे. सध्यांच्या निधर्मी राज्यांत तर सर्वधर्मीयांस सारखेच पूज्य वाटणारे व ज्यांच्यासाठीं सर्वधर्म समन्वय घडून आला होता, अशा श्रीसाईबाबांचें चरित्र किती मननीय आहे हें सांगण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं.

———

## नामजपाचा महिमा

[ चाल :– कळेना अजुनी माझें मला ]

वासना धरुनी कां रे जीवा।
जगीं कां कोण सुखी झाला ॥ धृ. ॥

परमार्थ केला ज्या भाविकांनीं।
मुखी वदले, मी मी म्हणूनी।
काय मिळाले धर्म हा करुनी।
घेई वाहूनी यात्र देहाला ॥१॥

नका ठेवूं भेद अंतरी।
पाहूं जाता हेंच खरोखरी।
आत्मा जो परमात्मा श्रीहरी।
ह्या देवाचा विसर मनाला ॥२॥

साईनाथानें मशिदी बैसून।
अंतर ज्ञानें दिधले सांगून।
नाम जपा रे महिमा जाणून।
अन्य न ठावें हनुमंताला ॥३॥

—हनुमानसिंह ठाकोर

———

# हरिजन भक्त नंद आणि त्याची भक्ति

**********************************

**नंदाचा जन्म हरिजन कुटुंबांत झालेला असला, तरी त्याच्या भक्तीचें सामर्थ्य फार मोठें होतें. भक्तीनें असाध्य गोष्टी साध्य होतात. नंदानें अग्नी प्रवेश केला, परंतु न भाजतां पोळतां तो अधिकतर तेजानें शाबूत बाहेर आला.**

नंदाचा जन्म झाला एका हरिजन कुटुंबांत. बालपणापासून त्याला देवभक्तीचें वेड जडलेलें होतें. कित्येकांच्य बाबतींत असें घडत असतें. त्याचें कारण पूर्व सुकृत आणि दुसरें काय असणार ? म्हटलें आहे ना कीं ' बहुत सुकृताची जोडी ! म्हणुनी विठ्ठल आवडी.' नंदाचें तसेंच झालें होतें.

नंदाला हरिभक्तीची आवड परंतु तो पडला हरिजन ! त्याला कोण घेणार देवळांत ! शेजारच्या गांवीं एक शिवमंदिर होतें. तेथें जाऊन व मंदिराबाहेर राहून तो शंकराच्या पिंडीचें दर्शन घेण्यासाठीं धडपडावयाचा; परंतु तेथेंही त्याच्या मार्गांत एक अडचण उभी रहावयाची. दरवाजासमोर एका प्रचंड नंदीची स्थापना करण्यांत आलेली होती. त्यामुळें शंकर व नंद यांच्यामध्यें नंदीचा आडपडदा होता.

परंतु नंदाचा भक्तिभाव होता प्रखर स्वरूपाचा. किती आशेनें व उत्कंठेनें तो दर्शनासाठीं धडपडावयाचा !

नंदाचें वय वाढत गेलें तसतसें त्याला वाटूं लागलें कीं, आपल्याकडून कांहींना कांहीं देवसेवा घडावी. परंतु हरिजन असल्यामुळें कोण त्याची सेवा स्वीकारणार ? एवढ्यानें तो निराश झाला नाहीं. तो एकसारखा विचार करीत होता. आपण हरीजन, तशांत दरिद्री. आपण काय बरें देऊं ? आपल्याजवळ देवाला देण्यासारखें काय आहे ? तो अत्यंत गंभीरपणें व चौकसपणें विचार करीत होता. इकडे तिकडे पहात होता. इतक्यांत त्याच्या नजरेला त्या मंदिरांतील मोठमोठाले ढोल पडले. सणावारीं, पालखीच्या वेळीं व इतर प्रसंगीं त्या ढोलांचा वाजविण्यासाठीं उपयोग करण्यांत येत असे.

नंदाच्या डोक्यांत चटकन् प्रकाश पडला. ढोलांसाठीं लागणारें कमावलेलें कातडें आपण देऊं शकतों. किती आनंद झालाय त्याला त्या विचाराबरोबर ! तो देवाचें नांव घेऊन त्या कामास लागला. चांगल्यापैकीं कातडें मिळवायचें व तें मेहनतीनें कमावून देवाला अर्पण करावयाचें, त्याच आनंदांत तो कित्येक दिवस रंगून गेला होता. ध्यानीं–मनीं रात्रंदिवस शिवशंकर. कारण तशाच ध्यानमग्न स्थितींत नंद मंदिरांत गेला व मोठ्या आतुरतेनें दरवाजाबाहेर राहून शंकराचें दर्शन घेण्यासाठीं धडपडूं लागला. देवाला त्याची दया आली ! आणि कां नाहीं येणार ? दर्शनासाठीं मोठ्या उत्कंठेनें धडपडणारा तो भोळाभाबडा जीव ! देवानें त्या

नंदीला दरवाजांतून थोडें दूर होण्याचा हूकूम सोडला, आणि काय आश्चर्य, तो नंदी देवाच्या अनुज्ञेप्रमाणें थोडा दूर सरकलाही. तंजावर जिल्ह्यांतील आडनूर गांवांतील ही घटना आहे. असें सांगतात कीं, त्या दिवसापासून नंदीनें जी दरवाजापासून एका बाजूला आपली बैठक मारिली ती आजही तशीच बाजूला आहे!

नंदाला शंकराचें हवें तसें दर्शन घडलें, त्यानें ती मूर्ती डोळे भरून पाहून घेतली व डोळ्यांत संपूर्णपणें सांठविली. तेथेंच त्याची त्या क्षणीं समाधि लागली.

असें सांगतात कीं, त्या समाधि स्थितींत नंदाला चिदंबरम् येथील नटेश्वराची मूर्ति दिसूं लागली. तें एक अत्यंत पवित्र स्थान आहे. जन्ममरणाचा फेरा चुकवायचा असेल तर तेथें जावें आणि नटेश्वराचें दर्शन घेऊन पुण्यपावन व्हावें असें त्याला तीव्रतेनें वाटूं लागलें.

केवळ वाटूं लागलें एवढेंच नव्हे; तर दुसऱ्या दिवशीं चिदंबरम्ला जाण्याचा निर्धार करून त्यानें तो अंमलांतही आणिला.

नंदाची भक्ति अनन्यसाधारण होती. आणि देव अशा भक्ताला नाहीं पावणार तर दुसऱ्या कोणाला पावणार? नंद चिदंबरम्ला गेला आणि तेथील नटराज मंदिराच्या दक्षिण दरवाजापाशीं दर्शनार्थ हजर झाला. त्याच रात्रीं नटराज मंदिराचे जे पुरोहित होते त्यांच्या स्वप्नांत त्या देवतेनें त्यांना दृष्टांत दिला कीं, नंद या नांवाचा भक्त माझ्या दर्शनासाठीं आला आहे. तो अत्यंत पवित्र आहे. तरी त्याला तुम्हीं आपल्यांत सामावून घ्या.

देवाचा दृष्टांत! तेथें कोणाचें काय चालणार? एकजात साऱ्या पुरोहितांना एकाच प्रकारचा दृष्टांत झाला होता. दुसऱ्या दिवशीं सकाळच्या प्रहरीं ते एकत्र जमा होऊन नंदापाशीं आले व त्याला त्यांनीं दृष्टांताची जाणीव करून दिली.

नंतर त्या पुरोहितांनीं नंदाला शुद्ध करून आपल्यांत सामावून घेण्यासांठीं मंदिराच्या त्याच दक्षिण कोपऱ्यांत एक शास्त्रोक्त अग्नि पेटविला. नंदाला स्वतःच्या भक्तीबद्दल व व पावित्र्याबद्दल तिळमात्र शंका नव्हती. त्याचें मन नटराजाच्या भक्तीभावानें पूर्णपणें भारावून गेलेलें होतें. त्यानें कोणताहि विचार न करतां त्या पेटत्या अग्नींत उडी मारिली आणि क्षणार्धांत तो कोणत्याहि प्रकारचा धक्का न लागतां किंवा न भाजतां होता त्याहीपेक्षां अधिकतर पवित्र व तेजस्वी होऊन बाहेर आला.

त्या पुरोहितांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. ते थक्क होऊन पहात होते. नंदाला हाताशीं धरून ते पुरोहित त्याला नटराजांची स्थापना ज्या भागांत केलेली होती व जें अत्यंत पवित्र स्थान मानण्यांत येत असे तेथें घेऊन गेले.

नंदानें तें साजिरें गोजिरें रूप डोळे भरून पाहिलें. त्या सुंदर रुपाचें त्यानें आकंठ पान केलें व तें अमृतप्राशन करतां करता तो त्या ईशरुपाशीं विलीन होऊन गेला. त्याच्यांतील चैतन्य निघून गेले!

# ज्ञानाचे कण

**************

रात्रींची नीरव शांतता. सर्वत्र सामसूम आणि त्या रात्रींच्या पोटीं उषा जन्माला येत असते.

या जगांत दोन महान् शक्ति आहेत. एक शांतता व दुसरी म्हणजे आपली वाणी. शांततेंत कोणत्याही गोष्टीची तयारी होत असते. वाणीच्या द्वारें सर्जन होत असतें. शांतता कार्याला पोषक असें वातावरण तयार करते तर वाणी कार्याला उत्थापन देते; त्यांत जोर आणते.

शांतता, मौन पालन करणें याचें महत्त्व अपरंपार आहे. ज्याला अमृतत्त्वाकडे जावयाचें आहे व त्यासाठीं तयारी करावयाची आहे त्यानें नीरव शांततेचीच कांस धरली पाहिजे.

शांततेंतून, मौनांतून उत्तमोत्तम व जगाला थक्क करून सोडणारे विचार जगाला मिळत असतात व आजवर मिळाले आहेत.

—योगी अरविंद

---

# कां काळ असा तूं घालविशी ?

कां काळ असा तूं घालविसी ?
जाइ जाइ रे झणिं शिरडीसी !...॥ धृ० ॥

नटली 'द्वारका' श्री लीलांनी
कटु-निंबहि हो मधुर तपानीं
पुण्य-भूमि तीं पाहीं नयनीं
क्षण सुखांतची कां विसावसी ?... ॥ १ ॥

संत-समागम हीच शिदोरी
संत-वचन, नित सुधा पान करि
सद्गुरु-चिंतन असो अन्तरीं
प्रभु-कृपा-छत्र लाभेल तुशीं !—॥ २ ॥

हें माझें रे ! तें माझें रें !
सरेल यांतच जीवित सारें
इथेच उरतिल 'पाश-पसारे'
अंति न येतिल तव कामासी !... ॥ ३ ॥

कां काळ असा तूं घालविसी ! !

——मधुकर घोलप, पुणें

---

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद



लें० : एक साईभक्त

## अध्याय आठवा

(पुढें चालू)

कित्येक पापी आपल्या निजकर्मामुळें शरीरग्रहणार्थ शुक्रबीज समन्वित होतांच देह धारण करीतात. कित्येक त्याहूनहि जे अधम आहेत त्यांना जंगमवर्ग प्राप्त होतो व मागून यथाकर्म स्थावरभाव त्यांना प्राप्त होतो. ज्यानें जसें ज्ञान संपादिलेलें असतें व ज्याचें जसें कर्मानुष्ठान असतें त्याप्रमाणें त्याला देह धारण करावा लागतो. श्रुतिप्रमाण हा योग येत असतो. 'यथाप्रज्ञं हि संभवा' असे अतिशय दयाळू माता जी श्रुति ती सांगत आहे. जसा ज्याचा ज्ञानाचा ठेवा असतो तसेंच त्या जीवाला मनहि असते. ईश्वरी लीला अतर्क्य आहे. त्याचें संपूर्ण ज्ञान होणेंहि अशक्यप्राय आहे. जर कोणाला अंशमात्रानें हें लाभत असेल तर फक्त एका नरदेहालाच. धन्य तो नरदेह! परमभाग्यानें हा नरदेह प्राप्त झाला असून महत पुण्यामुळें त्यांतल्या त्यांत ब्राह्मणवर्ण मिळाला ईश्वरकृपेनें श्रीसाईचरणाचा लाभ झाला; तेव्हां हा लाभ अलभ्य नाहीं का ?

अनेक योनीमध्यें मानवयोनीच श्रेष्ठ आहे. आपण आलों कोठून, निर्माण कोणी केलें याची जाणीव फक्त मानवालाच आहे. इतर योनींना ह्याचें ज्ञान नसतें. भूत वर्तमान आणि भविष्य, गगिमान तसेंच ईश्वरस्थिति यांची त्यांना जाणीव नसतें. त्या जशा उपजतात तशाच नाशही पावतात. हा नर विवेक आणि वैराग्य यांचा अंगीकार करून माझें भजनगान करील म्हणून ह्या नरदेहाची उत्पत्ति करून ईश्वरास अतिशय आनंद वाटला. हा नाशिवंत नर साधनाद्वारें अविनाशी, नारायण बनून जाईल. नर देहासारखा साधनसंपन्न दुसरा देहच नाहीं हें या जगांतील एक निर्विवाद सत्य आहे.

गारुडी स्वतः फारच चतुर असतो. अज्ञानी लोकांच्या समोर आपला खेळ दाखविण्यास त्याला आवडत नाहीं. आपल्या कुशलपणाचें वर्म जाणणाऱ्या प्रेक्षकांचीच तो अपेक्षा करीत असतो. त्याचप्रमाणें जगत् प्रभूनें पशुपक्षी, वृक्ष व वनस्पती आणि अपार जीव जंतू निर्माण केले. परंतु त्याचेंच त्याला सखेदाश्चर्य वाटून त्याची लील त्याला निःसार भासूं लागली. चंद्र, सूर्य आणि असंख्य तारकांनीं युक्त असलेला हा अफाट ब्रह्मांड विस्तार परमेश्वरानें निर्माण केला; परंतु निर्मिल्याच्या कौतुकाचा कोणी क्षणभर देखील विचार करीना. हा सर्व खेळ करण्यांत जगदीशाचा काय हेतू असाव

हें एकाही जीवजंतूला जाणतां येईना. जोंपर्यंत माझें हें अतुल वैभव जाणणारा प्राणी मी निर्मिला नाहीं तोंपर्यंत माझें हें कार्य संपूर्णपणें विफल होणार असें ईश्वराला वाटूं लागलें. करितां सारसार बुद्धीनें आपलें वैभव आकळील असा मानव त्यानें उत्पन्न केला. ईश्वराचें अगाध वैभव, त्याची अपूर्व शक्ति आणि त्याच्या मायेचा खेळ हा मानवदेह आश्चर्यपूर्वक रीतीनें जाणूं लागला. हाच नरदेह ज्ञान संपादन करून माझें चिंतन करील, माझें अवलोकन करील, आश्चर्यसंपन्न असा होईल. त्यायोगे माझा हा खेळ पूर्ण होईल. अशी तो जगन्नियंता अपेक्षा करूं लागला. प्रेक्षकांचा आनंद म्हणजेच माझ्या खेळाची सांगता. माझी या विश्वावरची नियंत्रणा पाहून हा नर कृतार्थता मानील काम्यकर्मे आणि द्व्योपार्जन यांतच आपला काळ न कंठितां तो यावज्जीव तत्वज्ञान संपादन करणें हेंच आपले जीवनसाफल्य आहे, असें त्याला उमगून येईल. अभेदज्ञान हेंच तत्त्व होय. उपानषद्ब्रह्मज्ञान हीच परमात्मोपासना आणि येथेंच भक्तांचा भगवान आहे गुरु ब्रह्म हीं दोन नव्हेत. ज्याला ह्या अद्वैताचें ज्ञान होतें व ह्या भक्तीमुळें तो हा मायासागर सुलभ रीतीनें तरून जातो. योग्य श्रद्धावंत पुरुष ज्ञान, वैराग्य संपादितात आणि आत्मतत्व चिंतनांतच सुख मानतात, तेच भाग्यवान भक्त जाणावे. स्वस्वरुपाविषयींचें अज्ञान निरसल्याशिवाय जो स्वतःस कृतार्थ समजतो तोच आत्मप्रगतीच्या मार्गांतला अडथळा आहे. ज्ञान आणि अज्ञान हे दोन्हीही विकार अविद्याजन्य आहेत. तरी कांट्यानें कांटा काढावा या न्यायानें त्यांचा त्याग करावा. ज्ञानानें अज्ञान दूर करावें. ज्ञानाज्ञानातीत होऊन निर्मळ स्वरुपस्थितीची जाणीव करून घेणें हेंच एक नरजन्माचे पर्यवसान आहे. मी आणि माझें त्याचप्रमाणें अज्ञानाची राख रांगोळी झाल्याशिवाय ज्ञानाला उजाळा येऊन त्याचा प्रकाश पडूं शकत नाहीं नरदेहगत कार्य मग तें निर्वाय अथवा अनिर्वाय असो; बुद्धिकर्तव्य निश्चयप्राय म्हणून जाणावें. आपणांस दुसरें काम नाहीं स्वस्थ बसून आराम करावा व ऐश्वर्य भोगावें अथवा निष्काम निश्चित होऊन रामनामाचें चिंतन करावें. शरीर, इंद्रिय, मन, बुद्धि ह्या सर्व आत्म्याच्या उपाधि आहेत. यामुळेंच आत्मा कर्मांचा भोग भोगीत असतो परन्तु आत्मा अनादि अभोक्ताच आहे. स्वभावतः आत्मा अभोक्ता आहे व त्याचें भोक्तृत्त्व औपाधिक आहे. हें सारें लक्षांत घेऊन प्राप्तकर्म विचारपूर्वक करावें इतकेंच नव्हे तर मनाचे धर्मही त्याचप्रमाणें आचारावेत. स्वधर्माचें कांटेकोर पालन करून सदैव आत्मचिंतनांत काळ कंठावा व स्वस्वरुपीं वृत्ती तल्लीन करून खरें समाधान प्राप्त करून घ्यावें यांतच नरजन्माचें पर्यवसान आहे. चारी पुरुषार्थ साधण्यास नरदेहासारखें अन्य साधन नाहीं. अभ्यासपरायण मानवास नारायण पदाची प्राप्ति झाल्याशिवाय राहत नाहीं. करितां जोपर्यंत शरीर नाश झाला नाहीं तोंपर्यंत एकही क्षण वायां जाऊं न देतां आत्मज्ञान संपादन करावें.

सागराच्या खार पाण्याचें मेघांत रूपांतर होतांच त्याचा क्षारपणा जाऊन तें गोड पाणी होतें; तशीच स्थिति गुरुपायीं विनत झाल्यावर होते. गुरुविना सद्गती नाहीं.

गुरूनें हातीं धरतांच जडजीव देखील उद्धरून जातात. मंत्र, तीर्थ, देव, द्विज, ज्योतिर्वेद आणि भेषज याजप्रमाणें सात गुरू आहेत. यांच्या ठिकाणीं ज्या प्रमाणांत भावना व भक्ति ठेवावी त्याच प्रमाणांत सिद्धी प्राप्त होते. अव्यक्ताचें व्यक्त होऊन बद्धाचें मुमुक्षूंत रूपांतर करून मुमुक्षास मुक्तिलाभ करून देतात हें सर्व ते परोपकारार्थ करीत असतात. व्याख्यानें, पुराणें यांच्या योगानें जें प्राप्त होणार नाहीं तें संत चरणाशीं नम्र होतांच सुलभतेनें हातीं येतें. संतांचें हालणें चालणें म्हणजे तो उपदेश असतो. क्षमा, शांति निःसंगता, भूतदया, परोपकारता, इंद्रिय निग्रह, निरहंकारता हीं आचरण्यास कठीण असतात. अनेक ग्रंथ पढतां पढतांही ज्याचा लाभ होऊं शकत नाहीं, तेंच त्या क्रियावंतानें पाहतांच सुलभ होऊन जातें. तसेंच हे अनंत तारांगण तो एकला संपादून भास्वत करतो. तसे हे संत अत्यंत उदार आहेत, त्यांच्या अनंत क्रिया सहज होतात, ते जीवांस बंधमुक्त करून त्यांस अत्यंत सुख देतात.

श्रीसाई महंत असेच ऐश्वर्यवंत, श्रीमंत संत आहेत; परंतु त्यांचें आचरण फकीराला शोभेसे असून ते नित्य आत्मचिंतनांत रत असतात.

---

सर्वांशीं सज्जनपणानें वागा, परंतु निकट संबंध मात्र फार थोड्याशींच जोडा; परंतु शत्रुत्व मात्र कोणाशींही बाळगूं नका.

—बेन फ्रँकलिन




# ए. आर. सावंत अॅन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**




**या** महिन्यांत श्रीसाई दर्शनासाठीं बाहेर गांवच्या भक्तांची बरीच गर्दी झाली होती. कांहीं कलाकारांनीं श्री समोर हजेरी दिली ती पुढील प्रमाणें :—

**कीर्तन** :– श्री. ह. भ. प. अनसुया अनंत घुर्ये, मुंबई. सौ. ह. भ. प. मिनाबाई केळकर नागपूर. सं. गवई मराठे.

**गायन** :– श्री. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर, साकुरी. श्री. वसंतशास्त्री देशमूख साकुरी. श्री. सदाशिव देशमूख, बारामती. श्री. आर्. एस्. बोरकर, मुंबई. श्री. आर्. एन्. श्रीकंठैय्या, स्टेशनमास्तर चितळी. श्री. दत्तराज खोत, मुंबई. श्री. राजाभाऊ कांबळे, अंबरनाथ ठाणें. श्री. विनायक रेगे, ठाणें. कु. प्रमिला करमरकर, मुंबई. श्री. दिगंबर केळकर, रायपूर. सौ. नलिनीबाई मुळगांवकर, मुंबई.

**हार्मोनियम वादन** :– श्री. उमेश मुळगांवकर, मुंबई. श्री. देवनाथ वैद्य, मुंबई. श्री. रामकृष्ण डांगे, मुंबई. श्री. प्रभाकर शांताराम पेडणेकर, दादर-मुंबई.

**तबला वादन** :– श्री. प्रभाकर यशवंत व्यवहारे, निफाड. श्री. गजानन गोविंद काणे, विरार.

**फिडलवादन**—श्री. बाळ दिघे, मुंबई.

**इलेक्ट्रीक हिटारवादन**—श्री. सुरेशभोई कोळीवाडा फणसवाडी, मुंबई २.

**नकला**—श्री. शाम गुते, परेल मुंबई १२.

**बांसरीवादन**—डॉ. चंद्रकांत जोशी, मुंबई.

**कव्वाली भजन**—श्री. सय्यदभाई बडोदेवाला, बडोदा.

ता. २–१२–६० शुक्रवार रोजी श्रीदत्तजन्मोत्सव श्रीदत्तजन्मकीर्तन श्री. मराठे सं. गवई यांचे. रात्रौ श्रीचे रथाची गांवांतून मिरवणूक मंगलवाद्य, सुरसनई, चौघडा, बँडवादन, भजन, गारूडभारूडसह.

**श्रीचे दर्शनास** आलेल्या असंख्य भक्तांत प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारखी मंडळी म्हणजे वरिष्ठ न्यायालयाचे न्यायमूर्ती मुधोळकर व त्यांच्या परिवारांतील मंडळी, मुंबई न्यायालयाचे न्या. अभ्यंकर व त्यांची मंडळी, ग्वाल्हेरचे महाराज व त्यांचा परिवार, लवाजमा, ना. बाळासाहेब भारदे ( सहकार मंत्री ), उपमंत्री सज्जनसिंग, नागपूरचे कमिशनर साहेब श्री. राणासाहेब, वगैरे या सर्वांनीं श्रीस अभिषेक, पूजा अर्चा, श्रीसत्यनारायण पूजा वगैरे यथाविधि केले. व तेथील संबंधीत मंडळीनीं त्यांना उत्तम प्रकारचें सहकार्य केलें.

तसेंच डिसेंबरमध्यें नाताळांत पुणें, औरंगाबाद, धुळें, मुंबई वगैरे अनेक ठिकाणांहून खास गाड्यांनीं शेकडों विद्यार्थी दर्शनार्थ व सहलीनिमित्त शिरडींत आले होते. त्यांच्या रहाण्यासवरण्याची व जेवणाखाण्याची व्यवस्था संस्थानतर्फे समाधानकारक रीतीनें ठेवण्यांत आली होती. कोणाचीही गैरसोय होऊं नये यासाठीं शक्य तेवढी दक्षता बाळगण्यांत आली होती.

**रहाण्यासाठीं जागा**—शिरडींत येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसें दिवस वाढत चालली आहे; तसतशा त्यांच्या सुखसोयीसाठीं नवीन इमारती अस्तित्वांत येत आहेत. संस्थानतर्फे वीस खोल्यांची एक नवी चाळ सध्यां बांधण्यांत येत असून, त्या इमारतीचें काम या दोन महिन्यांत संपून श्रीरामनवमीच्या सुमारास त्या खोल्या तयार होतील व त्या महोत्सव प्रसंगीं येणाऱ्या लोकांची त्यामुळें सोय होणार आहे.

---

# श्रीसाईनाथ वाचनालय, शिरडी

## :—देणगीदाखल पुस्तकें व देणगीदार:—

| अ. नं. | भक्तांचीं नांवें | पत्ता | पुस्तकें | पुस्तकांचीं नांवें |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. हरीभाऊ त्र्यंबक शेळके | शिर्डी | १२ | मराठी पुस्तकें |
| २ | ,, डी. के. मिराणे | ,, | ६ | हिंदी पुस्तकें |
| ३ | ,, डी. जी. बसरूर | मुंबई | १ | ज्ञानेश्वरी बारावा अध्याय |
| ४ | ,, शिवनेस स्वामी | कोईमतूर | १ | ज्ञानेश्वरी प्रवचन |
| ५ | ,, रावसाहेब रघुनाथ कोते | शिर्डी | १ | सावळ्या तांडेल |
| ६ | ,, योगी एस्. एस्. ए. रमैया | मद्रास | ५ | इंग्लिश पुस्तकें |
| ७ | ,, श्री. एल्. के. कुंभार | धुळें | १० | मराठी पुस्तकें |
| ८ | कुमारी उज्वला बाजीराव कोते | मुंबई | १ | टारझन भाग १ ला |
| ९ | श्री. जयराम शंकर शेळके | शिर्डी | १ | वर्तुळाचे दुसरे टोंक |
| १० | डॉ. मिस् कोकिळाबाई लडवडी | मुंबई | १ | गुरू ॐ |
| ११ | श्री. अनंत व्यंकोजी खांबेकर | शिर्डी | ३ | क्रांत दर्शन, जीवन दान, मुंबई राज्यांत हिंदीचा प्रसार. |
| १२ | श्री. बाबुराव अर्नाळकर | मुंबई | ७ | मराठी पुस्तकें |
| १३ | ,, सगुण मेरू नाईक | शिर्डी | २ | अलौकिक संत श्रीसाईबाबा श्रीसाईबाबांचा परिचय |
| १४ | श्री. श्याम खुशालचंद गंगवाल | ,, | १ | नागकन्या नारायणी नलिनी |
| १५ | सौ. कांचनमाला क. देसाई | पांचगणी | १० | हिंदी पुस्तकें |





रेच्या पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद ३. [ आंध्र प्रदेश ]**



